
बुधवार, २८ सप्टेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ७१
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## विद्यापीठ अधिनियमातील सुधारणा विधेयक मागे



**मुंबई :** राज्यातील अभिमत विद्यापीठांमधील प्रवेश तसेच शुल्क याचे विनियमन करण्यासाठी केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आलेले विधेयक मागे घेण्याचा निर्णय मंगळवारी (दि. २७) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. केंद्र शासनाच्या प्राधिकरणांकडून घेण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या आधारे अभिमत विद्यापीठांमध्ये प्रवेश बंधनकारक करण्यात आलेले आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमांकरिताचे प्रवेशदेखील संबंधित शिखर संस्थांकडून विनियमित होतात. ही बाब लक्षात घेता हे विधेयक मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम सुधारणाचे विधेयक मागे घेण्यात येणार असून दुरुस्तीसह पुन्हा लागू करण्यात येईल.


## अंतरंग

नवरात्रोत्सवात ध्वनीक्षेपकास आता १ ऑक्टोबरलाही सूट/२

अमली पदार्थांविरोधात उपमुख्यमंत्र्यांना साकडे/६

आज भारत वि. आफ्रिका पहिली टी-२० लढत/८


# ठाकरे गटाला मोठा धक्का | सत्तासंघर्ष | शिंदे गटाला मोठा दिलासा

## ▌पक्षचिन्हाबाबतचा निर्णय निवडणूक आयोग घेणार
## ▌कार्यवाहीस स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**महाराष्ट्रातील सत्तासंघर्षादरम्यान मंगळवारी (दि. २७) सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत निवडणूक आयोगाच्या कामकाजावर स्थगिती आणण्यास घटनापीठाने नकार दिला. त्यामुळे शिवसेनेच्या धनुष्यबाण या पक्षचिन्हासंबंधी निर्णय घेण्याचा निवडणूक आयोगाचा मार्ग मोकळा झाला आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाला हा मोठा धक्का असून शिंदे गटाला मोठा दिलासा मिळाला आहे.**

*सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. राज्यातील जनता आमच्यासोबत आहे. उद्धव ठाकरे गटाने शिवसेना कोणाची हे ठरवण्यापासून निवडणूक आयोगाला रोखावे अशी मागणी केली होती, मात्र सर्वोच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळली आहे. आम्ही संवैधानिक मार्गाने जाणारे आहोत. आम्ही काहीही बेकायदेशीर करीत नाही.*

***–एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री***

न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती एम. आर. शहा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह यांच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे ही सुनावणी झाली. या वेळी पहिल्यांदाच एखाद्या सुनावणीचे लाइव्ह प्रक्षेपण करण्यात आल्याने हा दिवस सर्वोच्च न्यायालयासाठी ऐतिहासिक ठरला.

आपणच खरी शिवसेना असल्याचा शिंदे गटाचा दावा असून निवडणूक आयोगाला यासंबंधी निर्णय घेण्यापासून रोखले जावे, अशी मागणी ठाकरेंच्या वतीने करण्यात आली होती. घटनापीठाने ठाकरे गटाची ही याचिका फेटाळून लावली.

दिवसभर झालेल्या सुनावणीनंतर घटनापीठाने निवडणूक आयोगाच्या कामकाजावर स्थगिती आणण्यास नकार दिला. यामुळे आतापर्यंत धनुष्यबाण हे शिवसेनेचे पक्षचिन्ह मिळवण्यासाठी शिंदे गट आणि ठाकरेंमध्ये न्यायालयात सुरू असलेली लढाई आता निवडणूक आयोगासमोर चालणार आहे.



**मुंबई : राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची रायगड व रत्नागिरी जिल्हा पालकमंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीनंद पटवर्धन व इतर उपस्थित होते.**

(छाया : लक्ष्मण ठाकूर)



### पनवेलमध्ये 'व्होकल फॉर लोकल' अंतर्गत विविध वस्तूंचे प्रदर्शन

# स्थानिक उत्पादनांचा प्रसार करा

## ▌आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक वस्तू आणि उत्पादनाप्रती अभिमान महत्त्वाचा आहे. त्या अनुषंगाने स्थानिक उत्पादनांचा प्रसार करा, असे आवाहन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २७) येथे केले.



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये निरनिराळे उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी 'व्होकल फॉर लोकल' शीर्षकाखाली विविध वस्तूंचे प्रदर्शन शहरातील गोखले सभागृहात आयोजित करण्यात आले असून या दोनदिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुनील घरत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, भाजप सरचिटणीस अमरीश मोकल, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, विकास घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, नीता माळी, वृषाली वाघमारे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप, गौरव कांडपिळे, सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, **(पान २ वर..)**

## निवडक

### दाऊदचा विश्वासू साथीदार रियाझ भाटीला अटक

**मुंबई :** कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमचा निकटवर्तीय आणि गँगस्टर रियाझ भाटीला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अंधेरीतून अटक केली. त्याच्यासह छोटा शकीलचा साडू सलीम कुरेशी उर्फ सलीम फ्रूटविरुद्ध वर्सोवा पोलीस ठाण्यात खंडणी आणि जीवे मारण्याची धमकी देण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सलीम फ्रुटला यापूर्वीच राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अटक केली असून तो न्यायालयीन कोठडीत आहे.

### अभिनेत्री आशा पारेख यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

**मुंबई :** यंदाचा प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी याबाबतची घोषणा केली. आपल्या दमदार अभिनयाने ६० ते ७०च्या दशकात बॉलीवूड गाजवणाऱ्या अभिनेत्री म्हणून पारेख यांना ओळखले जाते. त्या ७९ वर्षांच्या आहेत.

# खालापूरच्या वरोसेतील शिवसैनिक भाजपमध्ये

## कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांचे नेतृत्व स्वीकारले



**चौक : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन खालापूर तालुक्यातील वरोसे येथील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यामुळे वरोसे गावात शिवसेनेला खिंडार पडले आहे.

आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. २६) सायंकाळी वरोसे गावात झालेल्या या कार्यक्रमास माजी आमदार देवेंद्र साटम, वासांबे ग्रामपंचायतीचे सरपंच सचिन तांडेल, चौक विभाग अध्यक्ष गणेश मुकादम, गणेश कदम, युवा नेते भूषण पारंगे, प्रवीण ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# खेरणे ग्रामपंचायत निवडणुकीसाठी भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या विविध १८ जिल्ह्यांतील ८२ तालुक्यांमध्ये ग्रामपंचायत निवडणूक होणार आहे. यामध्ये पनवेल तालुक्यातील खेरणे ग्रामपंचायतीचाही समावेश असून निवडणुकीसाठी भाजपच्या उमेदवारांनी तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. २६) तहसीलदार कार्यालयात अर्ज दाखल केले.



खेरणे ग्रामपंचायत निवडणुकीसाठी भाजपकडून सरपंचपदासाठी शैलेश बाळराम माळ, तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून रूपाली चंद्रकांत गोंधळी, राजेंद्र आत्माराम गोंधळी; प्रभाग २मधून प्रिया विलास गोंधळी, सुरेखा रंजित गोंधळी, अशोक गणपत गोंधळी; प्रभाग ३मधून राजेश शामा माळी, सुभद्रा संतु माळी, अक्षता सचिन पाटील; प्रभाग ४मधून संतोष मुरलीधर गोंधळी, प्रतिभा राजेश माळी, महेश नागेश माळी यांनी उमेदवारी अर्ज पनवेल तहसीलदार कार्यालयात निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाखल केले.

अर्ज दाखल करतेवेळी भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, खेरणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच बुधाजी माळी, चंद्रकांत बंडू गोंधळी, कोंडीनाथ पाटील, काशिनाथ गोंधळी, के. के. गोंधळी, ज्ञानेश्वर गोंधळी, रमेश माळी, बाळाराम माळी, धोंडीराम पाटील, मधुकर गोंधळी, कृष्णा गोंधळी, नरेश माळी, हिरामण गोंधळी, पांडुरंग माळी, वासुदेव माळी, जगदिश गोंधळी, पुष्पा माळी, चांगुणा माळी, रूपाली गोंधळी, वैशाली गोंधळी, प्रियांका गोंधळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. या निवडणुकीसाठी १६ ऑक्टोबरला मतदान, तर १७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

### नवरात्रोत्सव विशेष

# चौल बागमळा येथील महालक्ष्मी





**रेवदंडा : महेंद्र खैरे**

रेवदंडा–अलिबागपासून १४ किमी अंतरावर असलेल्या चौल बागमळा येथील छोट्या टेकडीवर प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेले श्री महालक्ष्मीचे जागृत देवस्थान आहे. गोल घुमटाच्या आकाराचे हेमाडपंथी दगडी बांधकाम असलेले हे मंदिर सुमारे सातशे वर्षांपूर्वीचे असावे. मंदिर कोणी व केव्हा बांधले यांचा उल्लेख उपलब्ध नाही, पण श्री महालक्ष्मी चंडिकादेवी आंग्रे घराण्याची कुलस्वामिनी असल्याचा व त्यांच्या वंशजांनी नित्याने या मंदिरात भेट दिल्याचा उल्लेख आढळतो.

श्री महालक्ष्मी मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान असून ही देवी नवसाला पावते असे सांगितले जाते. गुजरात राज्यातून सोरटी सोमनाथवरून महाराष्ट्रात आलेल्या रेवदंड्यातील भट घराण्याला या मंदिरात पुजेचा मान मिळाला असून सध्या या मंदिराचा मालकी हक्क आशिष भट यांच्याकडे आहे, तर गुरव म्हणून कृष्णा बाबू पाटील काम पाहतात.

महालक्ष्मीचे मंदिर पूर्वाभिमुख असून एका बाजूला भव्य अशी दीपमाळ, तर दुसऱ्या बाजूला तुळशी वृंदावन आहे. सुबक नक्षीमध्ये कोरलेल्या व आठ महिरपी नक्षीदारांनी सजलेल्या प्रशस्त सभागृहात १५०पेक्षा जास्त घंटा बांधलेल्या आहेत. मंदिराचा गाभारा विटा व चुन्याचा वापर करून बांधला गेलेला आहे. गाभाऱ्यात प्रदक्षिणेच्या वाटेवर प्रत्येक दिशेला दोन अशा आठ कोनाड्यासारख्या खुल्या खिडक्या असल्याने प्रदक्षिणा मार्ग प्रकाशमान होतो. मंदिरातील महालक्ष्मीची मूर्ती पाषाणापासून बनविण्यात आली आहे.

या मंदिरात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. या वेळी मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप येते. या काळात भाविक मोठ्या संख्येने देवीच्या दर्शनास येतात. दसऱ्याच्या दिवशी मंदिरात सोने लुटले जाते व देवीच्या मुख्यवट्याची पालखी बागमळा गावातून फिरविण्यात येते.

# मास्टरमाइंड स्पर्धेत 'आरटीपीएस'चे सुयश

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये (आरटीपीएस) मास्टरमाईंड या वार्षिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सोमवारी (दि. २६) संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला. त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देत गौरव केला.

मास्टरमाइंड ही वार्षिक स्पर्धा असून विद्यार्थ्यांना प्रथम शालेयस्तरावर मदत करते. त्यानंतर निवडलेले विजेते राज्यस्तरावर आणि शेवटी संपूर्ण देशात होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची आहे. त्या अनुषंगाने रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये मास्टरमाईंड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत २३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात २२२ पात्र झाले असून राज्यस्तरावर ए व ए+ गुण मिळविले त्यांची राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली आहे. या विजेत्यांपैकी ४१ विद्यार्थी स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील चॅम्पियन बनले. त्यानुसार १५ विद्यार्थ्यांनी ट्रॉफी आणि २६ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या वेळी मुख्याध्यापिका राज अलोनी व शिक्षक उपस्थित होते.

# संजय राऊतांचा दसराही तुरूंगात

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबईतील एक हजार ३४ कोटींच्या पत्राचाळ पुनर्विकासात झालेल्या आर्थिक घोटाळाप्रकरणी शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांचा आर्थर रोड जेलमधील मुक्काम वाढला आहे, कारण राऊत यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पीएमएलए कोर्टाने १० ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली आहे.

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) संजय राऊत यांना अटक केलेली असून सध्या ते आर्थर रोड तुरूंगामध्ये न्यायालयीन कोठडीत आहेत. राऊत यांनी जामीन मिळण्यासाठी अर्ज केला असून यावरील सुनावणी विशेष पीएमएलए न्यायालयात सुरू आहे. या प्रकरणी मंगळवारी (दि. २७) झालेल्या सुनावणीवेळी राऊत न्यायालयात उपस्थित होते. त्यांच्या वकिलांचा युक्तिवाद पूर्ण झाला. यानंतर ही सुनावणी १० ऑक्टोबरला पुढे ढकलण्यात आली. पुढील सुनावणीवेळी ईडीच्या बाजूने युक्तिवाद केला जाणार आहे.

# राज्यात २० हजार पोलिसांची भरती

## पदभरती निर्बंधांतून सूट देण्याचा मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

पोलीस दलातील शिपाई संवर्गातील रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी पदभरती निर्बंधांतून सूट देण्याचा निर्णय मंगळवारी (दि. २७) मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यामुळे २० हजार पोलीस शिपायांचे पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सद्यस्थितीत पोलीस दलातील सात हजार २३१ पदे भरण्याची कार्यवाही शासनाच्या मंजुरीनंतर सुरू झाली आहे. याव्यतिरिक्त २०२१मध्ये एकूण ११,४४३ पदे उपलब्ध झाली आहेत. २०२० आणि २०२१ या वर्षातील रिक्त पदे एकत्रितरित्या भरण्याची कार्यवाही झाल्यास पद भरती यंत्रणेवरील ताणही कमी करता येईल, यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

यासोबतच राज्यातील तुरुंगांमध्ये १,६४१ कैदी जामिन मिळूनही खितपत पडले आहेत. जामिनासाठी हमीदार, पैशांची व्यवस्था व कागदपत्रांची पूर्तता त्यांना करता येत नसल्याने त्यांना तुरुंगात राहावे लागत आहे. हे योग्य नसल्याने त्यांना आवश्यक कायदेशीर मदत आणि स्वयंसेवी संस्थांचे साहाय्य देऊन त्यांची तातडीने सुटका केली जाईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सद्यस्थितीत कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याने १०० टक्के रिक्त पदे भरल्यास त्यांना दिलासा मिळणार आहे.

### १ ऑक्टोबरलाही रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरास सूट

यंदाच्या नवरात्रोत्सवात १ ऑक्टोबर या दिवशीही उत्सवासाठी रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सूट देण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चेनंतर हा निर्णय घेतला आहे. सर्वसाधारणपणे संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून १३ दिवस निश्चित करण्यात येतात, तसेच दोन दिवस हे जिल्ह्यातील स्थानिक परिस्थितीनुसार सूट देण्यासाठी राखीव ठेवण्यात येतात. या वर्षी नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करता यावा यासाठी १ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवासाठी सकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सूट देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईमध्ये यंदाच्या नवरात्रोत्सवासाठी सोमवार, ३ ऑक्टोबर आणि मंगळवार, ४ ऑक्टोबर या व्यतिरिक्त शनिवार १ ऑक्टोबर हा आणखी एक वाढीव दिवस उपलब्ध होणार आहे.

# ‘वन कर्मचाऱ्यांना मिळणार पोलिसांप्रमाणे लाभ’

**मुंबई : प्रतिनिधी**

जीव धोक्यात घालून वनांचे संरक्षण करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना आता पोलीस कर्मचाऱ्यांप्रमाणेच लाभ मिळणार आहेत. मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. २७) झालेल्या बैठकीत या विषयीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली, अशी माहिती वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

मुनगंटीवार म्हणाले, पोलीस कर्मचाऱ्यांना शासनातर्फे विविध लाभ देण्यात येतात, तसेच लाभ वनांचे संरक्षण करतांना जीव धोक्यात घालणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना मिळावेत ही वन कर्मचाऱ्यांची मागणी काही वर्षे प्रलंबित होती. वणवे विझवताना, शिकार रोखताना, वनांतील वृक्षचोरी वा अन्य प्रकारची चोरी रोखताना, जखमी किंवा मानवी वस्तीत शिरलेले वन्यप्राणी वाचविताना वन कर्मचाऱ्यांच्या



मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

जीवाला धोका असतो. अनेकदा नैसर्गिक आपत्तींना वन कर्मचाऱ्यांना तोंड द्यावे लागते.

वन विभागाच्या प्रस्तावानुसार वनांचे व वन्यप्राण्यांचे संरक्षण करताना वन कर्मचारी मृत्यूमुखी पडल्यास अशा कर्मचाऱ्याच्या वारसाला २५ लाख सानुग्रह अनुदान देण्यात येईल. त्याचप्रमाणे कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या वन कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर प्राधान्याने नोकरी देण्यात येईल, जर वारस नोकरी करण्यास सक्षम नसेल किंवा वारसाने नोकरी नाकारली, तर मृत कर्मचाऱ्याच्या नियत सेवानिवृत्तीपर्यंतचे वेतन कुटुंबाला देण्यात येईल, तसेच कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या पार्थिवाचे कुटुंबाने ठरवलेल्या ठिकाणपर्यंतचे वहन करण्याचा खर्च शासनातर्फे करण्यात येईल, असेही मुनगंटीवार यांनी सांगितले.

कर्तव्य बजावताना वन कर्मचारी जर कायमचा दिव्यांग झाला तर त्या श्रेणीप्रमाणे तीन लाख ६० हजार ते तीन लाख रुपये सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येईल. कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या कर्मचाऱ्याच्या उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करेल. या निर्णयामुळे वन कर्मचाऱ्यांना आता भरीव लाभ मिळणार आहे. त्यामुळे वन कर्मचाऱ्यांचे नीतीधैर्य वाढेल, असेही मुनगंटीवार यांनी सांगितले.

# मालवाहू गाडीचे डबे इंजिन सोडून राहिले मागे; प्रवासी वाहतूक खंडित



**कर्जत : बातमीदार**

पुणे-मुंबई मार्गावर कर्जतकडून कल्याणकडे जाणाऱ्या मालवाहू गाडीचे दोन डब्यांमधील कपलिंग तुटले. त्यामुळे त्या मालवाहू गाडीचे चार डबे मागे राहिले आणि अन्य गाडी पुढे गेली. असा विचित्र प्रकार घडल्यामुळे मध्य रेल्वेवरील वाहतूक २० मिनिटांसाठी खंडित झाली.

कर्जत येथून निघालेली मालवाहू गाडी सकाळी १०च्या सुमारास नेरळ रेल्वेस्थानक ओलांडून जात होती, मात्र त्यानंतर मेन लाइनवरून वाहतूक करीत असलेली मालवाहू गाडीचे तीन डबे आणि गार्ड डबा असे चार डबे मागे राहिले. या मालवाहू गाडीच्या दोन डब्यांमध्ये असलेले कपलिंग तुटले होते आणि चार डबे मागे म्हणजे गेट नंबर ८६ यांच्या मागे थांबून राहिले होते. त्या ठिकाणी असलेली रेल्वेफाटकावरील प्रवासी हा प्रकार पाहत होते. शेवटी २० मिनिटांनी गाडीचे ते डबे पुन्हा जोडण्यात आले आणि त्यानंतर मालवाहू गाडी नेरळ स्थानकातून कल्याणकडे रवाना झाली. या प्रकारामुळे नेरळ पाडा येथील रेल्वेफाटक तब्बल ३५ मिनिटे बंद होते. त्याचा परिणाम मोठी वाहतूक कोंडी नेरळ रेल्वेफाटकाच्या दोन्ही बाजूला निर्माण झाली.

# दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी शिबिर

**अलिबाग : जिमाका**

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथे प्रत्येक बुधवार व गुरुवार, उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे प्रत्येक शुक्रवार, उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे प्रत्येक बुधवारी दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी शिबिर तसेच बहुदिव्यांग प्रमाणपत्र तपासणी अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दर गुरुवारी होते.

दिव्यांग असल्याच्या प्रमाणपत्र, तपासणीसाठी येण्यापूर्वी www.swalambancard.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार केंद्र येथून करता येते. जिल्हा सामान्य रुग्णालयात येताना सोबत ऑनलाइन अर्जाची प्रत, आधारकार्डची छायांकित प्रत, दोन फोटो, पूर्वीचे दिव्यांग प्रमाणपत्र असल्यास ते प्रमाणपत्र तसेच मेडिकल हिस्ट्री असेल तर त्याचे रिपोर्टस् सोबत आणावेत, असे अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने कळविले आहे.

# काळीज खरवली ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप रिंगणात

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील महत्वाच्या आणि आमदार भरतशेठ गोगावले यांच्या गृहातील काळीज-खरवली या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी सरपंचपदाचे सात तर सदस्यांचे ४४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. या निवडणुकीत भाजपदेखील रिंगणात उतरला असून सरपंचपदासह सदस्यपदाचे अर्ज दाखल केले आहेत.

महाड तालुक्यातील महत्त्वाच्या आणि श्रीमंत समजल्या जाणाऱ्या काळीज-खरवली ग्रामपंचायतीची निवडणूक जाहीर झाली असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सरपंचपदासाठी सात जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले, सदस्यपदासाठी ४४ अर्ज दाखल झाले आहेत. १३ सदस्य असलेल्या या ग्रामपंचायतीच्या सरपंचाची थेट जनतेतून निवडणूक होणार आहे.



शिवसेनेच्या शिंदे गटाच्या विधानसभेचे प्रतोद आ. भरत गोगावले यांची होमग्राऊंड समजली जाणाऱ्या या ग्रामपंचायत निवडणूकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या निवडणुकीत भाजपनेदेखील एन्ट्री केली असून सरपंचपदी दोन आणि सदस्यपदी सहा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, उपतालुकाध्यक्ष प्रभाकर झांजे, योगेश झांजे, उमेदवार संतोष सोनवणे, रविंद्र सागवेकर, तुषार महाजन आदी भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

अर्जांची छाननी बुधवारी (दि. २८) होणार असून, ३० सप्टेंबर रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. याच दिवशी उमेदवारांना चिन्हांचे वाटप होणार आहे, तर १६ ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून दुसऱ्या दिवशी निकाल लागणार आहे.

# अलिबाग : ग्रामपंचायत सदस्यपदासाठी ९१ अर्ज

## ■ कोप्रोली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीवर बहिष्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अलिबाग तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींच्या सदस्य पदासाठी ९१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. सरपंच पदासाठी वेश्वी आणि नवेदर नवगावमध्ये प्रत्येकी पाच अर्ज आले आहेत. कोप्रोली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीवर सर्वपक्षीय बहिष्कार असून सरपंचपदासाठी एकही अर्ज आलेला नाही.

ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या आहेत. यासाठी १६ ऑक्टोबर रोजी मतदान होत आहे. अलिबाग तालुक्यातील वेश्वी, कोप्रोली व नवेदर नवगाव या तीन ग्रामपंचायतींचा समावेश आहे.



मंगळवारी (दि. २७) उमेदवारी अर्ज भारण्याचा शेवटचा दिवस होता. अलिबाग शहरापासून जवळच असलेल्या वेश्वी ग्रामपंचायतीत सरपंचपदासाठी पाच उमेदवारी अर्ज आले आहेत, तर सदस्य पदाच्या ११ जागांसाठी ४५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नवेदर नवगाव ग्रामपंचायत निवडणुकीत जातपडताळणी प्रमाणपत्रांची समस्या असल्याने तेथे गेली अनेक वर्षे निवडणूकच झाली नव्हती. गेली १२ वर्षे तेथे प्रशासकाचा कारभार चालतो आहे, परंतु या वेळी शेकाप विरूद्ध शिवसेना शिंदे गट अशी सरळ लढत पहायला मिळणार आहे. सरपंचपद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असून त्यासाठी पाच अर्ज आले आहेत. सदस्यपदाच्या ११ जागांसाठी ४५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी प्रमाणपत्र ग्राह्य धरले जात नसल्याच्या मुद्यावर कोप्रोली ग्रामस्थांनी ग्रामपंचायत निवडणुकीवर या वेळीही बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सरपंच पदासाठी एकही उमेदवारी अर्ज आलेला नाही. सदस्यपदाच्या नऊ जागा असून त्यात एका जागेसाठी एकमेव अर्ज दाखल झाला आहे.

शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर ही पहिलीच निवडणूक होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी विजयासाठी कंबर कसली आहे. आता जनतेचा कौल कोणाला मिळातो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# जितक्या गरजा कमी तितके आयुष्य सुखी -शाहू पाटोळे

**अलिबाग : जिमाका**

मानवी आयुष्य हे खूप सुंदर आहे. यात भौतिक सुखाच्या मागे न लागता जितक्या गरजा कमी तितके आयुष्य सुखी. हा सुखाचा मूलमंत्र पूर्वांचल राज्यातील लोकांची आयुष्य जगण्याची पद्धत अभ्यासली की मिळतो, असे प्रतिपादन लेखक तसेच पत्र सूचना कार्यालयाचे माजी अधिकारी शाहू पाटोळे यांनी मंगळवारी (दि. २७) येथे केले.

राजा राममोहन रॉय यांची पुण्यतिथी व जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा माहिती कार्यालय येथे प्रसारमाध्यम प्रतिनिधींसोबत अनौपचारिक संवाद साधताना ते बोलत होते. या वेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कोकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाटोळे यांनी पूर्वांचल राज्यातील आपले अनुभव सांगताना तेथील समाज व्यवस्था, संस्कृती, राहणीमान, आहार-विहार, निसर्ग सौंदर्य, प्रशासकीय व्यवस्था, तेथील पत्रकारिता



आदी विषयांबाबत उपस्थितांना माहिती दिली. या संवादातून पूर्वांचल राज्याबद्दल अतिशय उपयुक्त माहिती मिळाल्याबाबत सर्वांनी आनंद व्यक्त केला.

सुरुवातीस उपसंचालक डॉ. मुळे यांनी उपस्थितांना शाहू पाटोळे यांच्या कार्याविषयीची माहिती दिली. मान्यवरांना जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी जिल्हा प्रशासनाचे विविध उपक्रम प्रतिबिंबित होणारे परिवर्तन कार्यपुस्तिकेचे तीनही अंक भेट दिले व शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# अलिबागमध्ये डाक अदालत

**अलिबाग : जिमाका**

अधीक्षक डाकघर रायगड विभाग, अलिबाग कार्यालयाद्वारे शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.

या डाक अदालतीत रायगड विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार, समस्या ज्याचे निवारण सहा आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनिऑर्डरसंबंधी तक्रारी विचारात घेतल्या जातील. इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार दोन प्रतीत डॉ. संजय लिये, अधीक्षक डाकघर रायगड विभाग, ४०२२०१ यांच्याकडे गुरुवारी (दि. २९)पर्यंत पोहचेल अशा रितीने पाठवावे, असे आवाहन अधीक्षक डाकघर रायगड विभाग डॉ. संजय लिये यांनी केले आहे.

## पान १ वरून

### स्थानिक उत्पादनांचा प्रसार करा

महिला मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे, शहर सरचिटणीस सपना पाटील, उपाध्यक्ष सुहासिनी केकाणे, नीता मंजुळे, मयुरी उनटकर, आदिती मराठे, सोनाली पवार, सपना ठाकूर, अनिता रणदिवे, अंजली इनामदार, सोनाली सावंत, सांस्कृतिक सेल जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, जितेंद्र वाघमारे, ज्येष्ठ नागरिक सेल शहर संयोजक उपेंद्र मराठे, रघुनाथ बहिरा, महेश सरदेसाई, चंद्रकांत मंजुळे, अप्पा शिंदे, अक्षय सिंग, शिवाजी भगत, यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

देशातील प्रत्येक नागरिकाने स्थानिक वस्तू म्हणजे स्थानिक उत्पादने खरेदी करावीत. आपल्याला लोकलसाठी व्होकल बनायचे आहे. स्थानिक वस्तूंचा वापर करायचा आहे. याशिवाय स्थानिक वस्तू आणि उत्पादनाप्रती अभिमानही बाळगायचा आहे. त्या अनुषंगाने स्थानिक उत्पादनांचा प्रसार करा, असे आवाहन या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

देशाला जगात ताकदवान बनविण्याचे काम करणारे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध आहेत. ते अंत्योदयाचा संकल्प देत देशातील गोरगरीब, शोषित व वंचित वर्गाच्या कल्याणाकरिता देशसेवेचे ध्येय साध्य करीत विविध जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी समर्पित भावनेने कार्यरत असतात. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत सेवात्मक, रचनात्मक, व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व अशा विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी ’व्होकल फॉर लोकल’ शीर्षकाखाली दोनदिवसीय वस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून याचा लाभ कार्यकर्ते आणि नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले आहे.

### खालापूरच्या वरोसेतील शिवसैनिक भाजपमध्ये

या वेळी शिवसेनेतून पंकज निकाळजे, प्रवीण निकाळजे, योगेश गायकवाड, जगदिश निकाळजे, उमेश निकाळजे, नितीन निकाळजे, रूपेश दत्ता निकाळजे, रूपेश वामन निकाळजे, सुभाष निकाळजे, किशोर निकाळजे, अंकुश निकाळजे, राहुल निकाळजे, सागर निकाळजे, आकाश निकाळजे, अश्विनी चाळके यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे उपस्थित मान्यवरांनी पक्षात स्वागत केले.

आमदार महेश बालदी यांनी आपल्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामांचा झंझावात सुरू केला आणि विकासाचा आलेख उंचावला. त्यामुळे विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा ओढा भाजपकडे वाढत असून वरोसे येथील शिवसैनिकांनी भाजपमध्ये प्रवेश करीत शिवसेनेला जोरदार धक्का दिला आहे.

## दुखवटा

### निर्मला धनावडे

**पाली :** रिलायन्स इंडस्ट्रिज नागोठणेचे डेप्यूटी जनरल मॅनेजर (एचआर), साहित्यिक रमेश धनावडे यांच्या मातोश्री आणि आदर्श शिक्षक प्रभाकर मोतीराम धनावडे यांच्या पत्नी निर्मला प्रभाकर धनावडे यांचे वयाच्या ८१व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. धनावडे कुटुंबिय मूळचे अलिबाग तालुक्यातील महान गावचे. गेली काही दशके त्यांचे वास्तव्य अलिबागला रायवाडी कॉम्प्लेक्स येथे आहे. आपल्या पुत्रांवर संस्कार करुन गृहिणी म्हणून निर्मला धनावडे यांनी कुटुंबावर चांगला ठसा उमटविला. मुलांचे वडील नोकरीनिमित्त बाहेर असताना आईने मुलांना शिक्षणासाठी सतत प्रोत्साहन देऊन त्यांच्यावर चांगले संस्कार घडवले. आपल्या कष्टाळू आणि प्रेमळ स्वभावाने त्यांनी अनेक माणसे जोडली. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी
पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २८ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल
Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

**निवडक**

### उरणमधील रक्तदान शिबिराला प्रतिसाद



**उरण :** टाटा हॉस्पिटल व खारघर ब्लड बँक यांच्या सहकार्याने कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब उरण, मी उरणकर सामाजिक व सांस्कृतीक संस्था उरण, माजी विद्यार्थी संघ, उरण महाविद्यालय, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरण, वूमन ऑफ विसडम शैक्षणिक व सामाजिक संस्था उरण तसेच टायगर ग्रुप उरण यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात मंगळवारी (दि. २७) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात एकूण ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्राचार्य बळीराम गायकवाड, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष सदानंद गायकवाड, वूमन ऑफ विसडम उरण या संस्थेच्या अध्यक्ष सारिका पाटील, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, टायगर ग्रुप उरणचे अध्यक्ष आकाश जोशी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, टाटा हॉस्पीटल व खारघर रक्तपेढीचे अधिकारी कर्मचारी वर्ग, मान्यवर व नागरिक या वेळी उपस्थित होते.

# पनवेल परिसरात गुन्हेगारीत वाढ

## घरफोडी, फसवणुकीच्या घटना; उपाययोजनेची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावत आहे. घरफोडी, भररस्त्यात हत्या, फसवणूक, ऑनलाइन गंडा असे गुन्हे पनवेल परिसरात सर्रास होताना दिसत आहेत. या घटनांमुळे परिसरातील नागरिकांत भितीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. अशा गुन्हेगारीला रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. तसेच पोलिसांसमोर अशा गुन्ह्यांचा छडा लावण्याचे आव्हान आहे.





पनवेलमध्ये नुकत्याच दोन घटना घडल्या आहेत.यामध्ये शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी येथे घरफोडी, क्रेडीट कार्डची मर्यादा वाढवून देण्याच्या बहाण्याने खारघरमधील महिलेस गंडा घातला आहे.

पहिल्या घटनेत शहरातील एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत लाखो रुपयांचा ऐवज व रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडली आहे. शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी येथे राहणारे संजय रीसबुड यांच्या बंद घराच्या दरवाजाला असलेले कुलूप अज्ञात चोरट्यांनी कशाने तरी तोडून घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने, हिऱ्यांचे अलंकार व रोख रक्कम असा मिळून जवळपास चार लाख २४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत क्रेडीट कार्डची मर्यादा वाढवून देण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्याने खारघरमधील एका महिलेची दीड लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या क्रेडीट कार्ड डिपार्टमेंटमधून बोलत असल्याचे सांगून एका सायबर चोरट्याने खारघरमधील महिलेशी संपर्क साधला होता. तसेच तिच्या क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवून देण्याचे आमिष दाखवत तिच्या क्रेडीट कार्डद्वारे ९८ हजार ९९९ व ५६ हजार असे दोन व्यवहार केले. तसेच या व्यवहाराचे ओटीपी मागून घेतले. त्यानंतर काही वेळात महिलेच्या खात्यातून दोन आर्थिक व्यवहार झाल्याचे मेसेज येताच आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले.

## कळंबोलीत हजारो रुपयांचा गुटखा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहत परिसरातून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पेण युनिटने प्रतिबंधित असलेला गुटखा, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या चार पान टपऱ्यांवर छापा मारून हजारो रुपये किमतीचा गुटखा व पान मसाला जप्त केला.

या कारवाईत अन्न व औषध प्रशासनाने सर्व पान टपऱ्या सील करून चारही चालकांवर कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. औषध प्रशासन विभागाच्या पेण युनिटने कळंबोली सेक्टर १ मधील अरविंदकुमार दुबे, बल्लू राजबहादुर चौरसिया, राजेद्र चव्हाण, अनंतलाल गुप्ता यांच्या पान टपऱ्यांची तपासणी केली.



या सर्व पान टपऱ्यांमध्ये गुटखा, पान मसाला, सुगंधीत सुपारी असा हजारो रुपये किंमतीचा साठा विक्रीसाठी ठेवल्याचे आढळले. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने त्यांच्याकडे खरेदी बिलांबाबत तसेच पुरवठादारांबाबत चौकशी केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पथकाने चारही पान टपरी चालकांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# रिटघर विद्यालयात कर्मवीर जयंती कार्यक्रम

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिटघर येथील भैरवदेव विदयालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्चमाध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. २७) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३५वा जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन केले व रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच या कार्यक्रमासाठी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, विद्यालयातील स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुभाष भोपी, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश पांडूरंग भोपी, वंदना भोपी, सरपंच अनुराधा वाघमारे, ग्रा. पं.सदस्य निराबाई चौधरी, दर्शना चौधरी, विद्यार्थी संघ अध्यक्ष वासुदेव भोपाजी, माजी विद्यार्थी संघ उपाध्यक्ष प्रल्हाद भोपी, शांताराम चौधरी, पोलीस पाटील दीपक पाटील उपस्थित होते.

मुख्याध्यापक बी. बी. साळुंखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर अरुणशेठ भगत, मा. ग्रा. पंचायत सदस्य गुरुनाथ उसाटकर, माजी उपसरपंच रमेश पाटील, अपेक्षा पाटील, संस्कार जाधव, समिक्षा चौधरी, ए. आर. पाटील यांनी कर्मवीरांच्या जीवन चरित्रावर भाषणे केली.



विद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना तसेच मागील वर्षी वर्गात प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना आणि इयत्ता दहावी व बारावीच्या शिक्षकांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन माळी मॅडम व आभार श्री. शेळके यांनी मानले.

### मोहटादेवी मंदिरात नवरात्र उत्सव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह नवीन पनवेल व पंचक्रोशीतील नागरिकांचे श्रद्धास्थान असले माता म्हणून प्रसिद्ध असलेली नवीन पनवेल येथील मोहटादेवी (रेणुका माता) मंदिरामध्ये यंदाही भक्तगण मोठ्या उत्साहात नवरात्र उत्सव जल्लोषात साजरा करीत आहेत.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये मोहटा देवीचे प्रसिध्द असे देवस्थान आहे. महाराष्ट्रभर मोहटादेवीचा भक्तगण आहे. प्रत्येक नवरात्र व इतर दिवशी मोहटा देवी्च्या दर्शनासाठी मोहटा गाव या ठिकाणी जाणे शक्य होत नाही. पनवेल, मुंबई या ठिकाणाच्या भाविक भक्तांना देवीचे दर्शन नवीन पनवेल येथील मोहोटादेवी मंदिरात घेतात.




**उरण : तालुक्यातील धुतुम गावची नवसाला पावणारी गावदेवीचे भाजप तालुका उपाध्यक्ष तथा उद्योजक प्रकाश ठाकूर व साधना ठाकूर यांनी दर्शन घेतले.**

## पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत दंगा काबू योजनाची रंगीत तालीम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत नवरात्री उत्सव सणाचे व ईद ए मिलाद सणाच्या अनुषंगाने शेडुंग टोल नाका येथे आज दंगा काबू योजनाची रंगीत तालीम पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.



दंगा काबू योजना रंगीत तालीममध्ये पनवेल तालुका पोलीस ठाणेकडील २ पोलीस निरिक्षक, ५ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ३ पोलीस उपनिरीक्षक, २६ पुरूष/महिला पोलीस अंमलदार हजर होते. तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे २ पोलीस अंमलदार, नवीन पनवेल फायर ब्रिगेडचे १ अधिकारी ४ कर्मचारी, ऍम्ब्युलन्स वरील कर्मचारी, बिट मार्शलचे पोलीस अंमलदार सहभागी झालेले होते.

नवरात्री उत्सव सणाचे व ईद ए मिलाद सणाच्या अनुषंगाने आयोजित दंगा काबू योजनेची रंगीत तालीम शेडुंग टोल नाका येथे पार पडल्याने कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडल्यास हे पथक अवघ्या काही वेळेतच त्या ठिकाणी दाखल होऊन तेथील परिस्थिती सुरळीतपणे हाताळेल, अशी माहिती अधिकारी वर्गाने दिली आहे.

## जेएनपीटी टाऊनशिप येथे समर्थ दांडिया रास

**उरण : वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही श्री रत्नेश्वरी मातेच्या आशीर्वादामुळे ऐश्वर्या कला, क्रीडा व सांसृतिक मंडळ जेएनपीटी यांच्या वतीने जेएनपीटी टाऊनशिप येथे नवरात्रोत्सव साजरा करण्यात आला आहे. सोमवार (दि. २६) सप्टेंबर ते मंगळवार (दि. ४) ऑक्टोबर या कालावधीत समर्थ दांडिया रास २०२२ चे आयोजन करण्यात आले आहे.

ऐश्वर्या कला, क्रीडा व सांसृतिक मंडळाचे अध्यक्ष राजेश पाटील, कार्याध्यक्ष सुधीर घरत, सल्लागार प्रशांत पाटील असून किशोर तांडेल, जयप्रकाश पाटील, कैलास म्हात्रे, जगदीश भोईर, निशिकांत सुतार, जयप्रकाश भोईर, अमित घरत, आर्यन पाटील, राजकुमार कडू, अजित पाटील, प्रणित घरत, अमित जोशी, ज्ञानेश्वर भोईर, नितीन पाटील, निकेतन तांडेल, समाधान तांडेल, भूपेंद्र कडू, संकेत कडू, प्रतिक घरत, राजेश पाटील, राजेश कडू, हरेश बंडा, हर्षवर्धन म्हात्रे, कुंदन कडू, मंडळाचे सर्व सभासद, कार्यकर्ते व महिला मंडळ आदींचे सहकार्य मिळणार आहे, असे कार्याध्यक्ष सुधीर घरत यांनी सांगितले.

## बिल्डर असोसिएशनच्या अध्यक्षपदी आनंद पाटील



**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रीयन बिल्डर असोसिएशनच्या अध्यक्षपदी आनंद पाटील सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आल्यानंतर उपस्थित पदाधिकारी व सदस्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.दरवर्षीप्रमाणे असोसिएशनची यंदाची नवीन कार्यकारिणी मंडळाची निवड करण्यात आली. यात आनंद विलासराव पाटील यांची अध्यक्षपदी म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या संदर्भातील एक परिपत्रक जारी करण्यात आले. त्याचप्रमाणे महासचिव म्हणून हितेश सावंत आणि खजिनदार म्हणून महेश माटे यांची निवड करण्यात आली. आनंद पाटील यांनी मावळते अध्यक्ष संतोष आंबवणे यांच्याकडून कार्यभार स्वीकारला.

या वेळी ज्येष्ठ सदस्य संग्राम पाटील, के. के. म्हात्रे, मधू पाटील तसेच मावळते महासचिव बाबासाहेब भोसले आणि खजिनदार लक्ष्मण साळुंखे तसेच मीडिया प्रमुख राजेंद्र कोलकर तसेच प्रवीण शेट्ये, अजित येलमार, आशिष कवडे, सुनील ठोंबरे, उत्तम येलमार, संजय इंगळे, प्रशांत शेट्ये आणि पवन देवलकर आदी सदस्य उपस्थित होते.

## कळंबोली प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय पोषण आहार दिन साजरा



**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय पोषण आहार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध अन्नधान्य, कडधान्य, फळभाज्या, तसेच पोषक जीवनसत्व बाबत माहिती विशद केली. पोषण आहार याबाबत माहिती घेऊन विविध पक्वानांचा स्वाद घेऊन राष्ट्रीय पोषण आहार दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पकतेतून पालेभाज्या फळभाज्या कडधान्य यातून विविध कलाकृतीही सादर करून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांचे कडून शाबासकीची थाप मिळवली.

राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय पोषण आहार अंतर्गत सप्टेंबर महिना हा राष्ट्रीय पोषण माह म्हणून राज्यभर साजरा केला जातो. त्यानिमित्ताने विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विविध पालेभाज्या कडधान्य फळभाज्या वापरून तिरंगा थाळी साकारली होती. तर विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पकतेतून विविध प्राणी पक्षी यांच्या कलाकृतीही सादर केल्या होत्या.यासाठी विद्यार्थ्यांनी घरूंन विविध पोषक पदार्थ बनवून आणले होते. तसेच पोषक पदार्थ दाखविणाऱ्या रांगोळ्या व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. राष्ट्रीय पोषण आहार जल्लोषात साजरा करण्यासाठी विद्यालयातील सर्व सहाय्यक शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

## सावळे येथे आरोग्य शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सावळे ग्रामपंचायत व जी. डी. पोळ फाऊंडेशन, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर राजिप शाळा सावळे येथे झाले. या शिबिराचा ५३२ नागरिकांनी लाभ घेतला. यासोबतच या वेळी आयुष्मान भारत योजना कार्ड २३८ नागरिकांना देण्यात आले.

या उपक्रमांना रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास डोंगरे, अल्काइल अमाईन्स प्रा. लि.चे व्यवस्थापक कल्पेश पाटील, डॉ. प्रमोद पोळ, डॉ. चव्हाण, डॉ. योगिता ठाकूर, भाजप गुळसुंदे जि. प. विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, गुळसुंदे पं. स. विभागीय अध्यक्ष सुनील माळी, माजी सरपंच संतोष माळी, शिवाजी माळी, सावळेचे सरपंच सतीश म्हस्कर, उपसरपंच प्रगती जांभुळकर, माजी सरपंच प्रशांत माळी, बळीराम कांबळे, संतोष माळी, शिवाजी माळी, संजय केदारी, माजी उपसरपंच कांता कांबळे, दत्तात्रेय म्हस्कर, ग्रा. पं. सदस्य रश्मी गाताडे, सुरेखा कुरंगळे, कविता माळी, सदाशिव माळी, मारूती माळी, हभप कान्हा गडगे, हासुराम केदारी, भाऊ मते, बाळाराम मते, प्रभाकर जांभुळकर, देवळोलीचे माजी उपसरपंच उदय झिंगे, सिताराम माळी, विष्णू माळी, महादेव जांभुळकर, बाळाराम कुरंगळे, यशवंत कुरंगळे, रामचंद्र केदारी, जनार्दन केदारी, जनार्दन माळी, जनार्दन गाताडे, योगेश कांबळे आदी उपस्थित होते.

## कळंबोलीत माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांची जयंती

**पनवेल : वार्ताहर**

अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, माथाडी कामगार नेते, मराठा आरक्षणासाठी पहिले बलिदान देणारे अण्णासाहेब पाटील यांची ८९ जयंती कळंबोली येथे रामदास शेवाळे प्रतिष्ठानतर्फे साजरी करण्यात आली.

कळंबोली बिमा नाका स्टील मार्केट या ठिकाणी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कष्टकरी गोरग़रीब जनतेला स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या आण्णासाहेब पाटील यांना अभिवादन करण्यासाठी शेकडो नागरिक व माथाडी कामगार उपस्थित होते.

या वेळी भावूक झालेल्या माथाडी कामगारांनी आण्णासाहेब पाटील अमर रहे जा जयघोष केला. दरम्यान, अनेक माथाडी कामगारानी आपली मनोगते व्यक्त केली. या वेळी रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत फाळके, महेश गोडसे, एस डी हवालदार, सागर मोरे, निलेश दिसले, सागर मोरे, आमृत तरंगे, प्रकाश सपकाळ लहू मलकमिर, तानाजी जाधव, ज्ञानेश्वर गावडे, विठ्ठल शिंदे यांच्यासह शेकडो माथाडी कामगार उपस्थितीत होते.



## संपादकीय

# ऑपरेशन ऑक्टोपस!

देशपातळीवरचे 'ऑपरेशन ऑक्टोपस' राबवून राष्ट्रीय तपास यंत्रणांनी गेल्या काही दिवसात 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' उर्फ 'पीएफआय'या इस्लामी संघटनेची पाळेमुळे खणून काढत शंभरहून अधिक संशयितांना अटक केली आहे. या मोहिमेत एनआयए, ईडी, रॉ आणि आयबी या तपास संस्था एकत्रित सहभागी झाल्या आहेत. मंगळवारीही या मोहिमेंतर्गतच्या दुसऱ्या फेरीत ठिकठिकाणी छापे घालण्यात आले. त्यातून भयचकित करणारी माहिती समोर येऊ लागली आहे.

**काही दिवसांपर्यंत 'पीएफआय'चे नावही बहुतेकांना ठाऊक नव्हते. दहशतवादी कारवायांमध्ये सक्रिय राहिलेल्या आणि नंतर बंदी घातल्या गेलेल्या 'सिमी' या संघटनेचेच हे नवे रुप असल्याचे आता सांगितले जात आहे. गेले अनेक महिने 'पीएफआय'च्या पदाधिकाऱ्यांवर पाळत ठेवली जात होती. परदेशातून छुप्या पध्दतीने पैसा गोळा करुन देशात घातपाती कारवाया करण्याचे कारस्थान रचले जात होते. तसेच पंतप्रधान मोदी यांच्या बिहारमधील प्रचारयात्रेदरम्यान त्यांची हत्या घडवून आणण्याचा भयानक कट रचला जात होता. इतकेच नव्हे तर येत्या पंचवीस वर्षांत भारताचे रूपांतर इस्लामी राष्ट्रात करण्याचा दीर्घकालीन आणि व्यापक 'कार्यक्रम' या संघटनेने हाती घेतला होता असे आरोप आता होत आहेत. केरळमध्ये हत्यासत्र घडवून आणण्यासाठी पीएफआयने आखलेली हिट लिस्ट जाहीर केली जाऊ नये अशा सूचना आता एनआयएला देण्यात आल्या आहेत. सामाजिक शांतता राखण्याचे दृष्टीने हे पाऊल उचलले जात आहे. 'पीएफआय'शी संबंधित संशयितांच्या बँक खात्यांमध्ये एकशेवीस कोटी रुपयांचा संशयास्पद व्यवहारही आढळल्याचे तपास यंत्रणांचे म्हणणे आहे. 'पीएफआय'वर कारवाई झाल्यानंतर त्या संघटनेने शुक्रवारी देशव्यापी हरताळ पुकारला होता. त्याची सर्वाधिक झळ केरळला बसली. या संघटनेचा फैलावही मुळात केरळमधूनच झाला. देशाच्या अन्य भागातही उग्र प्रतिक्रिया उमटल्या. केरळात सत्तरेक बसेस आणि वाहनांना आंदोलकांनी आगी लावल्या. दगडफेकींमध्ये अनेक पोलिसही जखमी झाले. पुण्यातही 'पीएफआय'ने निदर्शने केली. केंद्रीय तपास यंत्रणांनी एवढी मोठी मोहीम छेडल्यानंतरही या संघटना बेमुर्वतपणे हिंसक आंदोलने करण्याची हिंमत करतात, हेच मुळात संतापजनक आहे. दरवेळी असे काही घडले की पोलिस दले सतर्क होतात. उलटसुलट राजकीय प्रतिक्रियाही उमटतात. पोलिस दलांकडून नाकाबंदीसारखे स्थानिक उपाय अवलंबिले जातात. कालांतराने सारे काही ढिले पडते. या बेसावध काळातच दहशतवाद्यांचे कारनामे चालू राहतात. हे दुष्टचक्र थांबवायचे असेल, तर स्थानिक पोलिस दलांच्या पातळीवर 'खबरीं'चे जाळे तयार होणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात राजकीय शेरेबाजीही ताबडतोब थांबवणे गरजेचे आहे. दुर्दैवाने विरोधी पक्षांकडून अशा समस्यांवरही राजकारण केले जाते. त्यामुळेच तपास संस्थांकडून अत्यंत गोपनीयरित्या ऑपरेशन ऑक्टोपस राबवण्यात आले. महाराष्ट्रात पुणे, मुंबई, नवी मुंबई, सोलापूर आदी ठिकाणी छापे घालून काही जणांना ताब्यातही घेण्यात आले आहे. पीएफआयने आपली पाळेमुळे किती खोलवर नेली होती याचाच हा पुरावा मानला पाहिजे. 'पीएफआय'वर बंदी लादण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार वेगाने हालचाली करते आहे असे दिसते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या देखरेखीखालीच ही मोहीम राबवली जात आहे. दोघांचाही लौकिक पाहता ती यशस्वी होणार, यात शंका नाही. पण याबाबत निदान राजकारण तरी होऊ नये, एवढीच विरोधी पक्षांकडून अपेक्षा आहे.**

# नवीन पनवेलमधील वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

**खबरबात**
**नितीन देशमुख**





पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला सिडकोने नवीन पनवेल वसाहत बनवली. या वेळी सिडकोच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी भविष्यात होणाऱ्या विकासाचा वेध न घेतल्याने आज नवीन पनवेलमध्ये वाहतुकीची समस्या बिकट झाली आहे. त्यातच परिवहन खात्याने रिक्षांचे परवाने खिरापतीसारखे वाटले. त्याचा परिणाम पनवेल रेल्वे स्टेशनजवळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. वाहतूक पोलिसांची त्यावर तोडगा काढताना दमछाक होत आहे.

महाराष्ट्र शासनाने मुंबईची गर्दी कमी करण्यासाठी सिडकोची स्थापना करून नवी मुंबई शहर वसविले. त्यानंतर आणखी जागेची आवश्यकता वाटू लागल्याने सिडकोने पनवेल पूर्वेला वसाहत निर्माण केली. त्यावेळच्या सिडकोच्या अधिकाऱ्यांनी भविष्यात होणाऱ्या पनवेल आणि आजुबाजूच्या परिसराच्या विकासाचा वेध व्यवस्थित घेतला नाही.

नवीन पनवेल बाजूला त्यावेळी जागा स्वस्त असल्याने अनेकांनी जागा घेतल्या येण्या-जाण्यासाठी दुचाकी खरेदी केल्या. त्या उभ्या करण्यासाठी वाहन तळ अपुरा असल्याने रस्त्यावर उभ्या कराव्या लागतात. रेल्वे स्टेशन जवळील रस्त्यावर वाहतूक वाढणार याचा अंदाज सिडकोला आला नाही त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी ठेवली.

रेल्वे स्टेशनमधून बाहेर पडल्यावर उजव्या बाजूला विचुंबे आणि उसर्लीकडे रस्ता जातो, डावीकडे एचडीएफसी सर्कलवरुन खांदा कॉलनी, डी मार्ट, नेरे आणि आदईकडे तर बिकानेर कॉर्नरवरुन सरळ सुकापूर, नेरे येथे रस्ता जातो. या भागात मोठ्या प्रमाणात वसाहती झाल्याने नागरीकरण वाढले आहे. त्यामुळे या रस्त्यावर सतत गर्दी असते.

हॉटेल निलकमल समोर नेरे भागातील वसाहतींच्या खासगी बसचा थांबा आहे. त्या बस उभ्या राहिल्यावर वाहतूक कोंडी होते.

सेक्टर १५मध्ये दोन्ही बाजूला रस्त्यावर दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी केलेली असतातच पण पदपथावर ही दुचाकी वाहने उभी करून ठेवलेली असल्याने नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागते. त्यातच दुभाजकावरील खांबावर खालपर्यंत लावलेले जाहिरातीचे फलक व तीन ते चार फुट उंचीवर केबलचे जाळे असल्याने रस्ता ओलांडणेही धोकादायक झाले आहे.

बिकानेर कॉर्नरला रस्त्याच्या कोणत्याही बाजूला रिक्षा उभ्या असतात. रिक्षा स्टँडसाठी दिलेल्या जागेवर असतात. त्यापेक्षा जास्त रिक्षा आजुबाजूला उभ्या केलेल्या असतात. अबोली रिक्षासाठी खास स्टँड देण्यात आला. त्याठिकाणी काळी-पिवळी रिक्षाच उभी असते. त्या सर्कलला रस्त्याला मोठे मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे गाड्यांचा वेग कमी होतो.

एचडीएफसी सर्कलच्या दिशेने जाणाऱ्या बाजूला पूर्वी रिक्षा स्टँड नव्हता. आता त्या बाजूला सकाळ संध्याकाळ रिक्षा उभ्या असतात. त्यांची रांग अभ्युदय बँकेपर्यंत असते. त्याठिकाणी असलेल्या गॅरेज व दुकानासमोर उभी असलेली वाहने यांची एक लाईन असते. त्याच्या बाजूने रिक्षाची लाईन असते. त्यातच या लाईनमध्ये उभी करण्यासाठी येणाऱ्या रिक्षा वळविण्यासाठी जागा नसल्यामुळे वाहतूक कोंडी होते.

रेल्वे स्टेशनमधून बाहेर पडल्यावर अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाच्या कट्ट्याजवळ बसचा थांबा आहे. त्याठिकाणीच विचुंबेकडे जाणाऱ्या रिक्षांचा थांबा आहे. तेथे गाववाल्यांच्या दुचाकींची गर्दीही असते. त्यांना वाहतुकीच्या नियमांचे बंधन नसते.

बिकानेर कॉर्नरच्या सर्कलला सकाळ संध्याकाळ वाहतूक पोलीस ठेवावा ही मागणी अनेक वर्षे केली जात असून ही वाहतूक शाखेकडून कर्मचारी कमी असल्याचे कारण देऊन दुर्लक्ष केले जात आहे. पोलीस खाते रिक्षा परवाने वाटल्याबद्दल परिवहन खात्याला दोष देते. रिक्षांना मोठ्या प्रमाणात परवाने दिल्याने रिक्षा वाढल्या. त्यामुळे रिक्षा उभ्या करण्यासाठी जागा नाही असे सांगितले जाते पण या वादात सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. त्याला रस्ता ओलांडणेही अवघड झाले आहे. या ठिकाणी एखादी दुर्घटना घडण्याची तर पोलीस वाट पाहत नाहीत ना? अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे.

## बदलते तंत्रज्ञान



# व्हॉट्सॲपवर आता डू नॉट डिस्टर्ब मिस्ड कॉल अलर्ट...





ऋतूचक्रानुसार मान्सूनचे चार महिने संपत आले असताना, पावसाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. अशात दररोज कामानिमित्त बाहेर पडणाऱ्यांना याचा फार त्रास होतो. तसेच पावसामुळे सर्दी, ताप असे आजार लगेच पसरतात. या सर्व त्रासापासून सुटका मिळविण्यासाठी जर मुसळधार पाऊस येणार असेल तर त्याचा अंदाज आपल्याला असेल, तर तशी तयारी करून बाहेर निघू किंवा अशावेळी बाहेर जाण्याचे टाळू असे आपल्याला वाटते. ही माहिती जर तुम्हाला आधीच मिळवायची असेल तर काही ॲप्स तुम्हाला मदत करू शकतात.

जगभरात सर्वात लोकप्रिय ॲप म्हणून व्हॉट्सॲपची ओळख आहे. मेटा कंपनीचे हे सर्वांत जास्त वापरले जाणारे ॲप आहे. हे ॲप वापरण्यासाठी अतिशय सोपे आणि झटपट चॅटिंगमुळे लोकप्रिय आहे. लोकांच्या गरजा लक्षात घेऊन त्यात वेळोवेळी बदल केले जातात. व्हॉट्सॲप आपल्या वापरकर्त्यांना आनंदी ठेवण्यासाठी, दररोज नवनवीन अपडेट आणत असते. या अपडेट्समध्ये वापरकर्त्यांना अनेक उपयुक्त फीचर्स मिळतात. आता आपल्या वापरकर्त्यांसाठी व्हॉट्सॲप लवकरच नवीन 'डू नॉट डिस्टर्ब' आणणार आहे. हे फीचर ऑन केल्यानंतर वापरकर्त्यांला व्हाट्सॲपवर आलेल्या कॉलची माहिती मिळू शकेल. Wabetainfo च्या ताज्या रिपोर्टमध्ये या नवीन मिस्ड कॉल अलर्ट फीचरबद्दल माहिती मिळाली आहे. रिपोर्टनुसार, व्हॉट्सॲप लवकरच एक नवीन 'डू नॉट डिस्टर्ब' मिस्ड कॉल अलर्ट फीचर आणणार आहे. या नवीन अपडेटनंतर तुम्हाला व्हॉट्सॲपवर मिस्ड कॉलची माहिती चॅटमध्ये मिळेल. व्हॉट्सॲप कॉल किंवा मिस्ड कॉलची माहिती व्हॉट्सॲप चॅटमध्ये अजूनही उपलब्ध आहे, परंतु या नवीन अपडेटनंतर, 'डू नॉट डिस्टर्ब' चा नवीन अलर्ट प्राप्त होईल. ज्यानंतर व्हॉट्सॲप तुम्हाला 'डू नॉट डिस्टर्ब' मोड चालू केल्यानंतर हा मिस्ड कॉल मिळाल्याचेही सांगेल. दरम्यान, व्हॉट्सॲपवर अनेक नवीन फीचर्स येणार व्हॉट्सॲपवर येत्या काळात उपलब्ध होणाऱ्या नवीन फीचर्समध्ये पोल, एडिट, व्हॉइस स्टेटस अपडेट, व्हॉट्सॲप अवतार फीचर या फीचर्सचाही समावेश आहे. यापूर्वी मिळालेल्या माहितीनुसार, व्हॉट्सॲप लवकरच इनॲप सर्व्हे फीचरह आणणार आहे.

# प्राणघातक रेबीजपासून सावध राहा!

**निमित्त**



जागतिक रेबीज दिन २८ सप्टेंबर रोजी जाहीर झाला आहे. लुई पाश्चर यांचे या दिवशी निधन झाले. त्यांनी आपल्या सहकार्यांच्या सहकार्याने रेबीजची पहिली प्रभावी लस विकसित केली. जागतिक रेबीज डेचा उद्देश मानव आणि प्राण्यांवर रेबीजच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढविणे, धोकादायक रोग कसा रोखता येईल याविषयी माहिती आणि सल्ला प्रदान करणे आणि रेबीज नियंत्रणातील वाढीव प्रयत्नांसाठी समर्थन करणे हे आहे.

रेबीज हा उष्ण रक्ताचे प्राणी (विशेषतः कुत्रा, ससा, माकड, मांजर इत्यादी) चावल्यानंतर होणारा रोग आहे. या रोगामध्ये रोगी पाण्याला घाबरत असल्याने त्यास जलसंत्रास असे म्हणतात. रेबीज हा रोग झाल्यास तो प्राणघातक आहे. मात्र रोग होण्यापूर्वी लस देऊन त्यापासून संरक्षण करता येते.

रेबीज हा रोग कुत्र्यांनाही होतो. हा कुत्र्यांमुळे माणसात पसरणारा रोग आहे. कुत्रा चावल्यानंतर या आजाराची लक्षणे ९० ते १७५ दिवसात दिसू लागतात. जंगलातले लांडगे जंगली कुत्र्यांना चावतात. त्यामुळे जंगली कुत्र्यांना रेबीज होतो. ही जंगली कुत्री गावातल्या कुत्र्यांना चावतात, त्यामुळे त्यांना हा रोग होतो. अशी रेबीज झालेली कुत्री माणसास चावल्यास माणसांना हा रोग होतो. कुत्र्याच्या लाळेद्वारे या रोगाचा प्रसार होतो. साधारणपणे २ ते १२ आठवडे ताप आणि तापाची लक्षणे दिसून येतात. मानसिक त्रास, निद्रानाश, भास होणे, सामान्य माणसासारखे न वागणे, अतिशोयोक्ती करत वागणे अशी रोग्यात लक्षणे दिसून येतात. रेबीज झालेल्या माणसाला पाण्याची खूपच भीती वाटते. रेबीज झालेल्या माणसाचा घसा पूर्णपणे खरवडून निघतो व जेव्हा तो माणूस काही बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा घसा खरवडलेला असल्यामुळे कुत्र्याच्या भुंकण्याप्रमाणे आवाज येतो. वास्तविक कुत्रा चावला म्हणून असा आवाज येतो असे काही नाही. पण काही अशिक्षित माणसे असा विचार करून कुत्र्यांना मारतात. प्राणी चावल्याने जखम झाल्यावर लवकरात लवकर साबण व स्वच्छ पाण्याने धुतल्यास जखमेतील रेबीजचे जंतू कमी होण्यास मदत होते. शक्य असल्यास त्यावर टिसेप्टिक मलम लावावे व त्वरित जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. रेबीजवर पीईपी ही प्रभावी लस उपलब्ध असून कुत्रे चावल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने ती टोचून घेणे योग्य आहे. पेशंटने मानवी रेबीज इम्युनोग्लोबुलिनचा एक डोस व रेबीज लसीचे चार डोस १४ दिवसात घेतले पाहिजेत. रेबीज लसीचा पहिला डोस जखम झाल्यावर लवकरात लवकर दिला पाहिजे. त्यानंतर तीन, सात व चौदा दिवसांनी लसीचे डोस द्यावेत. ज्या पेशंटने जखम व्हायच्या आधीच लसीकरण घेतले असेल, त्याने इम्युनोग्लोबुलीनचा डोस नाही घेतला तरी चालतो. त्याने जखम झाल्यानंतरचे लसीकरण जखम झाल्यावर व दोन दिवसांनी घ्यावे. आजकाल पोटात घ्यायची इंजेक्शने देण्याची गरज नसून दंडावर देण्याचे इंजेक्शन उपलब्ध आहे.

**क्लिक...क्लिक...!**



**कर्जत : नवरात्रोत्सवात सध्या सगळीकडे धुके पसरत आहे. नेरळ रेल्वेस्थानकात सकाळी सात वाजताना टिपलेले हे चित्र. या वातावरणामुळे पाऊस परतीच्या वाटेवर असल्याची ही चाहूल समजण्यात येते.** (छाया : संतोष पेरणे)

## आरोग्य प्रहर

# उचकी थांबविण्यासाठी 'हे' घरगुती उपाय पाहा करून



उचकी येण्याची अनेक कारण असतात. लागोपाठ उचकी येणे हा एक प्रकारचा आजार आहे. उचकी लागल्यावर तुम्ही खूप अस्वस्थ होतात. उचकी रोखणे खूप अवघड होऊ जाते. आयुर्वेद तज्ञ डॉ. नितिका कोहली यांनी उचकीवरील प्रभावी घरगुती उपाय सांगितले आहे. जाणून घेऊया हे प्रभावी उपाय काय आहेत. उचकी येणे ही एक साधारण बाब आहे. उचकी आल्यानंतर आपण अनेक उपाय करतो. काही वेळेस ही उचकी थांबते तर काही वेळेस नाही.

कित्येकदा उचकी लागल्यास आपण लगेचच पाणी पितो. उचकी येण्याची अनेक कारणे असतात. लागोपाठ उचकी येणे हा एक प्रकारचा आजार आहे. उचकी लागल्यावर तुम्ही खूप अस्वस्थ होतात. आयुर्वेद तज्ञ डॉ. नितिका कोहली यांनी उचकीवरील प्रभावी घरगुती उपाय आपल्या इंस्टाग्राम पेजवर शेअर केले आहेत. जाणून घेऊया उचकी येण्याची कारणे आणि त्यावरील उपाय. पाळण्यातल्या बाळापासून ज्या गोष्टी डायाफ्रामला किंवा डायाफ्रामला जोडणाऱ्या मज्ञातंतूंना त्रास देतात त्यांना फ्रेनिक आणि व्हॅगस नर्व म्हणतात. यामध्ये कार्बोनेटेड पेये किंवा अल्कोहोल खूप वेगाने खाणे किंवा पिणे यामुळे परिणाम होतो. काही वैद्यकीय परिस्थिती जसे की ॲसिड रिफ्लक्स, ट्रिगर होऊ शकते तसेच उचकीदेखील लागू शकते.

उचकी थांबवण्यासाठी तुम्ही वेलची पावडर आणि कोमट पाणी वापरू शकता. यासाठी तुम्हाला एक ग्लास गरम पाण्यात एक चमचा वेलची पावडर टाकून उकळवा आणि १५ मिनिटांनी गाळून प्या. उचकीपासून मुक्त होण्यासाठी फक्त एक चमचा साखर हवी आहे. कदाचित यापेक्षा चांगला उपाय सापडणार नाही. यासाठी तुम्हाला फक्त एक चमचा साखर घ्यायची आहे आणि ती हळूहळू चावून खावी लागेल. हा एक अतिशय प्रभावी उपाय आहे. दही हा देखील उचकी थांबवण्याचा उत्तम उपाय आहे. एक चमचा दही खा असे केल्याने उचकी लगेच थांबेल. येथे दिलेली माहिती घरगुती उपचारावर आधारित आहे.

# माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

## अलिबागमध्ये शुभारंभ; तपासणी शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

महिला ही घराचा केंद्रबिंदू असते. तिच्या आरोग्याबाबतचे महत्व लक्षात घेऊन महिलांच्या आरोग्य सुरक्षितेसाठी माता सुरक्षित तर घर सुरक्षित ही अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी शिबिरांचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सोमवारी (दि. २६) अलिबाग येथे केले.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारपासून रायगड जिल्ह्यात माता सुरक्षित तर घर सुरक्षित ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात आला, त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. नवरात्रौत्सवामध्ये महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचा निर्णय शासनाच्या आरोग्य विभागाने घेतला असून, या निमित्ताने राज्यातील १८ वर्षांवरील युवती, गरोदर महिला, मातांची तपासणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.



माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या कालावधीत रोज सकाळी ९ ते दुपारी २ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. त्यात सर्व युवती, गरोदर महिला आणि मातांची आरोग्य तपासणी करून प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय मानव विकास मिशन अंतर्गत जास्तीत जास्त आरोग्य शिबिरे घेतली जाणार असून त्यामध्ये विशेष तज्ज्ञांमार्फत आरोग्य तपासणीचे नियोजन केले जाणार आहे. तसेच गावपातळीवर अंगणवाडी केंद्रांमधूनही महिलांची तपासणी केली जाणार असून त्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती डॉ. किरण पाटील यांनी या वेळी दिली.

या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रात, २८० आरोग्य केंद्रात दोन भरारी पथके यांच्यासह इतर आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत २१ वर्षांवरील सर्व महिला माता, गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा, सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशन सुविधा, या व इतर आरोग्य सेवासुविधा प्रत्येक गावात एक दिवस आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत आयोजित तपासणी शिबिरात महिलांची वजन, उंची मोजण्यात येणार असून त्यांची रक्त तपासणीदेखील केली जाणार आहे. माता व बालकांचे लसीकरणही यामध्ये केले जाईल, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांनी या वेळी दिली.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कटारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर, बालरोगतज्ज्ञ डॉ. रोकडे, पॅथॉलॉजिस्ट डॉ. शीतल जोशी, मेट्रन अनिता भोपी, असिस्टंट मेट्रन सीमा पाटील, नर्सिंग ऑफिसर गायत्री म्हात्रे आदी या वेळी उपस्थित होते. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक प्रमोद गवई यांनी आभार मानले.

## नेरळ रेल्वेस्थानकातील नवीन पादचारी पुलाचे काम सुरू



**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या मेनलाईनवरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकातील दुसऱ्या पादचारी पुलाचे काम रेल प्राधिकरणाकडून सुरु करण्यात आले आहे.

नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकाचा मेकओव्हर व्हावा यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याला रेल्वे मंत्रालयाने मंजूरी दिली आहे. सध्या फलाटावर असलेला पादचारी पूल कर्जतदिशेकडे असल्याने प्रवाशांना अडचणी येत होत्या. त्यामुळे मुंबई बाजूकडे नवीन पादचारी पूल उभारावा, यासाठी नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेकडून सातत्याने पाठपुरावा केला जात होता.

नेरळ स्थानकाचा कायापालट करणारा आराखडा राबविण्यासाठी तसेच नवीन पादचारी पूल उभारणीसाठी खासदार श्रीरंग बारणे यांचाही मध्य रेल्वेकडे पाठपुरावा सुरु होता. दुसरा पादचारी पूल उभारण्याच्यानिमित्ताने नेरळ स्थानकाच्या मेकओव्हर कामाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाल्याचे दिसून येत आहे. नेरळ स्थानकात आणखी एक पादचारी पूल, सरकते जिने आणि अन्य महत्वाची कामे सुरु होणार आहेत.

## पेण तर्फे तळे येथे गाव विकास आराखडा चर्चासत्र

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील पेण तर्फे तळे गावामध्ये गाव विकास आराखडा बनवण्यासाठी शनिवारी (दि. २४) चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात ग्रामस्थ आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

गाव विकास समिती, स्वदेस फाउंडेशन व ग्रामपंचायत यांच्यामार्फत गावात वेगवेगळी कामे कशाप्रकारे केली जाणार आहेत, याची माहिती या चर्चासत्रात ग्रामस्थांना देण्यात आली. हा आराखडा तयार करण्यासाठी स्वदेस फाउंडेशनचे समन्वयक किरण खेडेकर, आरोग्य समन्वयक प्राप्ती मोरे, राकेश पाखुर्डे यांच्यासह गावचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महिला मंडळ यांनी सहभाग दर्शवून आपले गाव आदर्श गाव बनवण्यासाठी निर्धार केला. त्यासाठी गाव विकास समिती स्थापन करण्यात आली आहे.



यामध्ये पन्नास टक्के महिलांचा समावेश करण्यात आला आहे. स्वदेस फाउंडेशन मार्फत या अगोदर गावात करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला व पुढील कामाचे नियोजन करण्यात आले. येत्या काही दिवसात प्लास्टिक निर्मूलन याविषयी गावातील महिलांचे प्रशिक्षण घेण्यात येणार असल्याची माहिती या चर्चासत्रात देण्यात आली.

## माणगावात दंगा काबू पथकाची प्रात्यक्षिके

**माणगाव : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माणगाव पोलीस ठाण्याच्या परेड मैदानावर सोमवारी (दि. २६) सकाळी दंगा काबू पथकाने प्रात्यक्षिके सादर केली. त्यात सात अधिकारी ४० अंमलदार सहभागी झाले होते. या वेळी दंगा काबू पथकाने माणगाव शहरात रूट मार्चही केला.

माणगाव पोलीस ठाण्याच्या दंगा काबू पथकाने सोमवारी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत शहरातील पोलीस परेड मैदानावर प्रात्यक्षिके सादर केली. त्यात माणगाव उपविभागातील सात



अधिकारी व १० अंमलदार तसेच पोलीस मुख्यालयातील आरसीपी प्लाटूनचे ३० अंमलदार सहभागी झाले होते. त्यानंतर या पथकाने माणगाव शहरात संचलनही केले.

## विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी स्वखर्चातून वाहन व्यवस्था

### कर्जतमधील तिघर शाळेच्या शिक्षकांचा स्तुत्य उपक्रम




**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील तिघर गावातील जिल्हा परिषद शाळेत दूरवरून येणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची वाहनाअभावी गैरसोय होत होती. यावर उपाय म्हणून शाळेच्या सर्व शिक्षकांनी स्वखर्चातून वाहनाची व्यवस्था केली आहे. या अनोख्या उपक्रमामुळे शिक्षकांचे कौतुक होत आहे.

तिघर येथील प्राथमिक शाळेत पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग असून परिसरातील वाड्या, वस्त्यांवरील विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. नांगुर्ले कातकरी वाडीमधील पहिली ते पाचवीचे विद्यार्थी अडीच किलोमीटर चालत तिघर शाळेत येत असतात, या लहान मुलांना चालत जाण्याचा त्रास होत होता. पावसाळ्यात गवत असल्यामुळे विंचू, सापाची भीती असते. तर नांगुर्ले कातकरीवाडीमधून चालत यावे लागत असल्याने पहिली ते पाचवीपर्यंतचे विद्यार्थी तिघर शाळेत यायला कंटाळा करीत असत. यावर उपाय म्हणून तिघर शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी वाहनाची व्यवस्था केली आहे. मुख्याध्यापक ईश्वर इंगळे, विषय शिक्षिका सविता खडे, उपशिक्षिका योगिता अहिरराव, उपशिक्षक जनार्धन पजई तसेच गाडी मालक राजेंद्र पवार यांनी या अनोख्या उपक्रमासाठी योगदान दिले.

## पालीवाला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे महोत्सवात सुयश



**पाली :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या पाली येथील शेठ ज. नो. पालीवाला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये सुयश प्राप्त केले आहे. हा महोत्सव नुकताच अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयात झाला. त्यात प्राचार्य लहूपचांग यांच्या मार्गदर्शनाखाली शेठ ज. नो. पालीवाला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी केतन गुप्ता (एफवायबीएससी) या विद्यार्थ्याने मराठी कथाकथन स्पर्धेमध्ये दूसरा क्रमांक पटकावला तर अजिंक्य कुथे (एसवायबीएससी) याने हिंदी कथाकथन स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. या विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष वसंतराव ओसवाल, सेक्रेटरी रविकांत घोसाळकर, प्राचार्य लहूपचांग, प्रा. विशाखा मानकामे यांनी अभिनंदन केले.

## कशेळेतील दिव्यांग विद्यार्थ्याला तीनचाकी सायकलची मदत

**कर्जत : बातमीदार**

नवी मुंबईतील श्री साई ट्रस्ट तर्फे कर्जत तालुक्यातील कशेळे येथील दिव्यांग विद्यार्थ्याला तीनचाकी सायकलची मदत करण्यात आली. कशेळे येथील ज्ञानानुभव विद्यालयात दिव्यांग विद्यार्थी कल्पेश दळवी (इयत्ता दहावी) शिक्षण घेत आहे. त्याची शिकण्याची जिद्द लक्षात घेऊन त्याला काही मदत मिळेल काय? अशी विचारणा मुख्याध्यापक मिल्के यांनी माणगाव येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले यांच्याकडे केली होती. घुले यांनी नवी मुंबईतील श्री साई ट्रस्टला कल्पेश दळवी या दिव्यांग विद्यार्थ्यांची



माहिती दिली. श्री साई ट्रस्टने संचालिका राधिका घुले यांच्या हस्ते कल्पेश दळवी याला तीनचाकी सायकल भेट दिली. या वेळी तिघर शाळेचे मुख्याध्यापक मिल्के, माणगाव शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले तसेच कल्पेशचे पालक यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

## नवरात्रोत्सव विशेष : नवसाला पावणारी कर्जत भिसेगावची श्री अंबे भवानी

**कर्जत : बातमीदार**

कर्जत रेल्वेस्थानकापासून अगदी दोन-तीन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या भिसेगावमध्ये श्री अंबे भवानी मातेचे मंदिर आहे. नवसाला पावणारे जागृत देवस्थान अशी या स्थळाची प्रचिती आहे.



भिसेगावच्या या श्री अंबे भवानीबद्दल उपलब्ध असलेली माहिती अशी की, कर्जत नगर परिषद हद्दीतील भिसेगाव हे गाव भिसेखिंडीच्या पायथ्याशी आहे. पूर्वी या ठिकाणी खूप जंगल होते. त्या काळात व्यापारी वर्ग मुंबई-पुण्याकडे जाताना याच खिंडीच्या मार्गाने जात असत. हे व्यापारी खिंडीनजीक असणाऱ्या विहिरीजवळ रात्री मुक्काम करून सकाळी पुढील प्रवासाला निघत. डोंगर माथ्यावर आदिवासी लोकांची वस्ती होती. एके दिवशी मुक्कामाला असतांना एका गुजराथी व्यापाऱ्याला स्वप्न पडले. स्वप्नात देवीने दर्शन दिले. 'मी या विहिरीजवळ असलेल्या वारुळात आहे. मला त्यातून बाहेर काढ, माझ्या सोबतीला एक काळा नाग आहे. तो तुम्हाला काही करणार नाही. मात्र या स्वप्नाकडे लक्ष न देता तो व्यापारी तेथून पुढे निघून गेला. काही दिवसांनी पुन्हा या ठिकाणी तो व्यापारी मुक्कामास आला असता त्याला तसाच दृष्टांत झाला. हा सर्व वृत्तांत त्याने आपल्या व्यापारी मित्रांना सांगितला. त्या वेळी त्या सर्व व्यापाऱ्यांनी ते ठिकाण शोधण्याचे ठरविले. डोंगर माथ्यावर राहणाऱ्या आदिवासींना मदतीला बोलून घेतले. सर्वजण वारूळ फोडण्यासाठी जमले असता त्या वारुळातून काळा नाग बाहेर आला व कुणालाही काहीही न करता दूर निघून गेला. त्यानंतर आदिवासी लोकांनी वारूळ फोडले, तर काय आश्चर्य खरोखर देवीची सुंदर रेखीव मूर्ती तेथे आढळली. ती मूर्ती पाहून सर्वांना आनंद झाला. आदिवासी व व्यापाऱ्यांनी सावली म्हणून देवीच्या डोक्यावर छप्पर उभारले. तेंव्हापासून व्यापारी येता जाताना देवीची पूजा करून दर्शन घेऊन आपापल्या कामाला जात असत.

या स्वयंभू देवीबाबत लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ लागला. तेंव्हा ज्या आदिवासी माणसाने वारुळास प्रथम हात लावला, त्याच्या स्वप्नात जाऊन देवीने सांगितले की, मी गुजराथ येथील अबुच्या पहाडावरील श्री अंबे भवानी आहे. तेंव्हापासून या देवीला श्री अंबे भवानी माता असे लोक म्हणू लागले.

अलिकडच्या काळात भिसेगाव ग्रामस्थांनी एकत्र येऊन या श्री अंबे भवानी मातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला असून, आता मोठा सभामंडप उभारून गोर-गरीब लोकांच्या शुभकार्याची व्यवस्था केली आहे.

## नेरळ ग्रामपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन चौथ्या दिवशी स्थगित

**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांनी शुक्रवारपासून कामबंद आंदोलन सुरु केले होते. मात्र ग्रामपंचायत प्रशासन आणि कर्मचारी संघटना यांच्यात सकारात्मक चर्चा झाल्यानंतर सोमवारी (दि. २६) हे काम बंद आंदोलन स्थगित करण्यात आले.

कामचुकारपणा केल्याबद्दल नेरळ ग्रामपंचायतीने आरोग्य विभागातील सहा हंगामी कामगारांना २२ सप्टेंबर रोजी नोटीस बजावली होती. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांनी शुक्रवारपासून काम बंद आंदोलन सुरु केले होते. या आंदोलनामुळे नेरळ गावातील रस्त्यावर कचरा साठून राहिला होता. ग्रामपंचायत प्रशासनांकडून शनिवारी स्थानिक रोजंदारी मजूर घेऊन गावातील कचरा उचलण्यात आला होता. दरम्यान, सोमवारी नेरळ ग्रामपंचायत आणि कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींची बैठक झाली. नेरळ ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या बैठकीला सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर, ग्रामविकास अधिकारी गणेश गायकर यांच्यासह सदस्य तर कामगार संघटनेकडून महेंद्र निगुडकर व पदाधिकारी उपस्थित होते.

सहा हंगामी कामगारांना दिलेली नोटीस मागे घेण्याचे आणि रिक्त असलेले मुकादम पद भरण्याचे या बैठकीत ठरले. त्यानंतर काम बंद आंदोलन स्थगित करण्याचे आश्वासन कामगार संघटनेने दिले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत **१) श्री. प्रवीण दत्तात्रेय म्हात्रे २) श्री. निलेश सदानंद पाटील ३) श्री. दिपक माणिक थळी, व ४) श्री. गोविंदा नरेश घरत,** यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- रानवड, ता. उरण, जिल्हा. रायगड**

| गट क्रमांक | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १२० | २ | ०-२६-१० <br> **पो.ख.** ०-०१-५० | ०६.५० |
| | | **एकुण** ०-२७-६० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक : २८/०९/२०२२

सही/-
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**

**पत्ता :** २०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड पिन कोड- ४००७०२, मोबाईल नं. ७४०००९७२८६

## निवडक



### प्रकाश गायकवाड यांना पुरस्कार

**मोहोपाडा :** रसायनी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांना चर्चगेट (मुंबई) येथे महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था व अमरदीप विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अनमोल रतन समाजसेवा पुरस्कार पद्मश्री डॉ. रमाकांत देशपांडे आणि डॉ. अमजतखान पठाण यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या वेळी व्यासपीठावर सिनेस्टार देशपांडे, एन. डी. खान, सलमा खान, निरज अगरवाल उपस्थित होते.

### आज माहिती अधिकारविषयक व्याख्यान

**पनवेल :** जनजागृती ग्राहक मंच रायगड, शाखा पनवेल व निवृत्त सेवक मंडळ पनवेल तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्त माहिती अधिकार या विषयावर माहिती अधिकार तज्ञ अनिल गलगली यांचे व्याख्यान बुधवारी (दि. २८) सायंकाळी पाच वाजता स्वामी नित्यानंद मार्गावरील उपजिल्हा शासकीय रुग्णालयाशेजारील काँग्रेस भवन येथे आयोजित करण्यात आले आहे.सबब पनवेलकरांनी बहुसंख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जनजागृती ग्राहक मंचाचे अध्यक्ष काशिनाथ जाधव व पनवेल तालुका निवृत्त सेवक मंडळाचे उपाध्यक्ष बी. पी. म्हात्रे व सचिव शिवदास पालकर यांनी केले आहे.

### संशोधन पद्धती विषयावर कार्यशाळा



**उरण :** तु. ह. वीर वाजेकर फुंडे येथे शुक्रवारी (दि. २३) आय.क्यू.ए.सी. व सेमिनार वर्कशॉप समितीच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. विष्णू भंडारे (सिद्धार्थ कॉलेज, मुंबई) यांनी मूलभूत संशोधन म्हणजे काय याविषयी मार्गदर्शन केले. संशोधनामधील बारकावे, लघु प्रकल्प लेखन याविषयी डॉ. उषा भंडारे यांनी मार्गदर्शन केले. विज्ञान शाखेतील संशोधन प्रकल्प या विषयावर डॉ. गुरमित वाधवा व डॉ.राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले. उद्घाटन प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक डॉ. राहुल पाटील यांनी केले तर, डॉ. स्मिता तांदळे यांनी आभार मानले. डॉ. श्रेया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आमोद ठक्कर, डॉ. एम. सी. सोनवले, उपप्राचार्य प्रा. घोरपडे उत्तमराव आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईतील अमली पदार्थांना आळा घालावा

## ‘अभाविप’चे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत अमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्याची मागणी ‘अभाविप’च्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. फडणवीस वाशी येथे एका कार्यक्रमासाठी आले होते. या वेळी त्यांना हे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात ‘अभाविप’च्या जिल्हा संयोजिका प्राची सिंह यांनी म्हटले आहे की, नवी मुंबईत अमली पदार्थाचे सेवन आणि विक्री मोठ्या प्रमाणात वाढली आहे. युवा पिढी अमली पदार्थांच्या आहारी जात आहे. यामुळे तरुण पिढी मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त होत आहे.

या पदार्थांच्या सेवनामुळे गंभीर प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. यांमध्ये चोऱ्या, मारामाऱ्या, अपहरण, अत्याचार अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. नवी मुंबईतील विविध ठिकाणी अमली पदार्थांची



विक्री उघडपणे केली जात आहे, असा आरोप प्राची सिंह यांनी केला आहे.

शाईची बाटली, पेनाची रिफिल अशा विविध वस्तूंच्या माध्यमातूनही या पदार्थांची विक्री केली जात आहे. सहावी ते दहावी या वयोगटातील विद्यार्थ्यांनाही यामध्ये लक्ष्य करण्यात आले आहे. या पदार्थांच्या सेवनामध्ये मुलींचे प्रमाण ६० टक्के असल्याचे दिसून आले आहे. अमली पदार्थांच्या आहारी गेलेले विद्यार्थी आणि तरुण घरातील पैसे चोरणे, मोबाइल चोरणे अशा गुन्ह्यांच्या माध्यमातून अमली पदार्थांची खरेदी करत आहेत.

तरुण पिढीला व्यसनाधिनतेपासून वाचवण्यासाठी याला आळा घालण्याची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित यंत्रणांना अमली पदार्थ विक्री करणारे आणि ते सेवन करणारे यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात यावे, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

## वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या हस्ते टाकेदेवीची घटस्थापन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील रसायनी हद्दीच्या टोकावर असणाऱ्या दांडफाटा येथील टाकेदेवीच्या पूजनाचा व आरतीचा मान रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांना देण्यात आला.

डोंगरे यांचे मंडळाचे पदाधिकारी सतीश महाडिक यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले. या वेळी टाकेदेवी मित्र मंडळाचे सतिश महाडिक, मंडळ अधिकारी किरण पाटील, सागर सुखदरे, दिलिप कदम, विलास पाटील आदीसह टाकेदेवी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म क्रमांक ७वर एक व्यक्ती जखमी अवस्थेत आढळला. त्याचा पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबतची माहिती पनवेल स्टेशन मास्तर यांनी पोलीस ठाण्यात दिली असून या व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध पोलीस घेत आहेत.

मयत व्यक्ती ही ६९ वर्षांची असून तिची उंची पाच फूट सात इंच, अंगाने मजबूत, रंग गहूवर्ण, चेहरा गोल, नाक सरळ, केस काळे पांढरे असून पुढील बाजूस टक्कल आहे. अंगात शर्ट व निळी पॅन्ट आहे. या व्यक्तीविषयी माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा ९८७०३१७२७२ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेल ज्येष्ठ नागरिक संघात डॉक्टरांतर्फे गाण्यांचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक संघातर्फे सुरबहार हा गाण्यांचा कार्यक्रम शनिवारी (दि.२४) संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम करणारे सर्वजण हे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर होते हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य होते. संगीताच्या माध्यमातून ७२ रोगांवर उपचार होतात, असे प्रतिपादन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. शशिकांत कामत यांचे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर यांनी स्वागत केले. डॉ. पूजा बांदेकर यांचे स्वागत उपाध्यक्षा माधवी गोसावी यांनी केले. डॉ. नम्रता जोशी, डॉ. सुदेशा रे, डॉ. विपुल सकपाळ यांचे स्वागत सचिव सुनील खेडेकर यांनी केले. तर निवेदिका डॉ. विदुला कामत यांचे स्वागत संघाचे माजी अध्यक्ष नंदकुमार जोशी यांनी केले.

डॉ. शशिकांत कामत, डॉ. पूजा बांदेकर, डॉ. सुदेशा रे, डॉ. विपूल सकपाळ, डॉ. अमृता जोशी आदींनी गाणी गायली. डॉ. नम्रता जोशी यांनी इतर गाण्या बरोबर लावणी ही सादर केली. या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकारिणी सदस्य, बहुसंख्य सभासद, पत्रकार लेखक दिलीप रेडकर उपस्थित होते.




## देवी दर्शन



जीवदानी महिला उत्कर्ष मंडळ व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित नवरात्रोत्सव, उलवे नोड



सार्वजनिक दुर्गामाता मित्र मंडळ, शिरढोण तळेआळी




सुवर्णा सार्वजनिक नवरात्रोत्सव, कोप्रोली



सार्वजनिक नवरात्रोत्सव, कसळखंड, पनवेल



सुषमा पाटील विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज, कामोठे



दुर्गामाता मित्र मंडळ, केळवणे



शिवतेज मित्र मंडळ, केळवणे

### उदे गं अंबे उदे!





दुर्गामाता दौड (माळ दुसरी) पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गामाता दौडचे नऊ दिवस आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमाची दुसरी माळ मंगळवारी करंजाडे येथे गुंफण्यात आली. सेक्टर ५, पोलीस चौकी येथील वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज स्मारकातून दुर्गामाता दौडला प्रारंभ झाला. ही दौड पूर्ण करंजाडेत मार्गक्रमण करून सिरवी समाज दुर्गामाता मंदिरात आली तिथे आरती करण्यात आली व तिथून पुन्हा स्मारकात येऊन दौडची सांगता झाली. या दौडला अबालवृद्धांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



**वाचाल तर वाचाल!**

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी ‘दैनिक राम प्रहर’च्या अंकात वाचा नवे पाक्षिक सदर वाचाल तर वाचाल. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत.

साहित्यिकांची आवडती पुस्तके येत्या २ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या रविवारी वाचूया डॉ. शीतल मालुसरे (महाड) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# लोकांची फसवणूक करणारे पक्ष पुन्हा दिसणार नाहीत

## आमदार महेंद्र दळवी यांचे विरोधकांवर टिकास्त्र

### अदाड येथील सामाजिक सभागृहाचे लोकार्पण



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगडच्या माजी पालकमंत्र्यांनी फक्त त्यांच्याच मतदारसंघात निधी नेला व कामे केली. आगामी काळात अलिबाग व मुरूड तालुक्यातील ७० टक्के शेकाप खाली होणार आहे. ज्या पक्षांनी लोकांची मते घेऊन फसवणूक केली ते पक्ष आगामी काळात दिसणार नाहीत, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी मुरुड तालुक्यातील अदाड येथे केले.

अदाड येथे उभारण्यात आलेल्या सामाजिक सभागृहाचे लोकार्पण आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. मुरूड तालुक्यातील २४ ग्रामपंचायती दत्तक घेत असल्याचे या वेळी आमदार दळवी यांनी जाहीर केले.

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुका शिंदे गट भाजपला सोबत घेऊन लढविणार आहे. या पुढे विरोधकांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे आमदार महेंद्र दळवी यांनी या वेळी सांगितले.

मुरूड शहराच्या विकासासाठी राज्य शासनाकडून ५५ कोटी रुपये देण्यात आले असून ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी शंभर कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ही कामेसुद्धा लवकरच सुरु होणार आहेत, असे सांगून आमदार दळवी यांनी, अदाड गावातील सर्व विकासकामे पूर्ण करण्याचे आश्वासन या वेळी दिले.

मागच्या आमदारांनी लोकांना दिलेले शब्द पूर्ण केले नाहीत मात्र आमदार महेंद्र दळवी यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्यामुळेच अदाड गावात भव्यदिव्य समाज मंदिर पहावयास मिळत आहे, असे भाजप नेते ॲड. महेश मोहिते यांनी सांगितले. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांच्या काम करण्याच्या शैलीने प्रभावित होऊन अदाड, बेलीवाडी व वडघर येथील शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला.

जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या मानसी दळवी, शिंदे गटाचे रायगड जिल्हा प्रमुख राजा केणी, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, जिल्हा संघटिका शुभांगी करडे, संघटक दिनेश मिणमिने, सरपंच हरिचंद्र भेकरे, माजी सरपंच भाई सुर्वे, अदाड शाखा प्रमुख नितेश पाटील, उपशाखा प्रमुख गजानन पाटील, निलेश घाटवळ, सुनील दिवेकर, भरत बेलोसे, यशवंत पाटील, संदीप पाटील यांच्यासह अदाड परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थळ विभाग भाजपतर्फे समुद्र किनारी वृक्षारोपण



**अलिबाग : प्रतिनिधी**

सेवा पंधरवडा अंतर्गत थळ विभाग भाजपतर्फे अलिबाग तालुक्यातील थळ समुद्र किनारी सुरू व इतर धुप प्रतिबंधक वृक्षांची लागवड करण्यात आली.

भाजप सोशल मीडिया विधानसभा प्रमुख पंकज अंजारा आणि महिला मोर्चा तालुका सरचिटणीस जान्हवी पारीख-अंजारा यांच्या पुढाकारातून थळ समुद्र किनारी आयोजीत केलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमास स्थानिक ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपचे अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, राज्य परिषद मंडळ सदस्य सतीश लेले, जिल्हा सचिव समीर राणे, तालुका सरचिटणीस संतोष पाटील, प्रशांत पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आलाप मढवी, तालुका उपाध्यक्ष निखील चव्हाण, सरचिटणीस निखिल चव्हाण, चिटणीस राजेंद्र पेढवी, संदीप पवार, सुनील माने, रवी पाटील आदि पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजप ओबिसी सेलचे रायगड जिल्हा अध्यक्ष जगदीश घरत, युवामोर्चा जिल्हा चिटणीस शैलेश नाईक, ज्येष्ठ नेते विकास काठे, संचालक लालू लट. सुदिन माळी यांनी विशेष मेहनत घेतली. समुद्र किनारी धुप प्रतिबंधक सुरू व इतर झाडांची लागवड केल्याबद्दल थळ ग्रामस्थांनी या भाजपचे आभार मानले.

# खोपोलीत बेकरी वस्तू निर्मिती प्रशिक्षण

**खोपोली : प्रतिनिधी**

सान्यो स्पेशल स्टील (मस्को) कंपनीच्या सीएसआर विभागातर्फे खोपोलीतील आण्णाभाऊ साठे सभागृहात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण व सबलीकरण करिता पंधरा दिवस कालावधीचा नि:शुल्क बेकरी वस्तू निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला. त्याचा लाभ ३२ महिलांनी घेतला.

या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारची नानकटाई, बिस्किट, मावा केक, साधा केक, विविध प्रकारचे आयसिंग केक सोबतच दहा प्रकारची आईस्क्रीम, चॉकलेट व चॉकलेट बुके असे विविध बेकरी वस्तू शिकवण्यात आल्या. प्रशिक्षणार्थी महिलांना पल्लवी पाटील यांनी प्रशिक्षण दिले.

या कार्यक्रमाचा समारोप समारंभ मंगळवारी (दि. २७) झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून



कंपनीचे मुख्य वित्त अधिकारी श्री. शैलेंद्र जैन, वरिष्ठ उपाध्यक्ष अविनाश सोमवंशी, सहाय्यक व्यवस्थापक तृप्ती पवार, विकास गणवीर, वरिष्ठ पत्रकार जयवंत माडपे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या चॉकलेट बुके व विविध प्रकारच्या केकची प्रमुख पाहुण्यांनी पाहणी केली. श्री शैलेंद्र जैन यांनी प्रशिक्षणार्थ्यींना मार्गदर्शन केले. अविनाश सोमवंशी, जयवंत माडपे यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

# पाली-खोपोली राज्यमार्गावर दुचाकीचा अपघात

## दोन तरुण गंभीर जखमी

**पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली राज्यमार्गावरील चिवे गावाच्या कमानीजवळ भरधाव दुचाकीने पिकअप जीपला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील खवली येथील दोघे तरुण गंभीर जखमी झाले आहेत.

वाहन चालक शांताराम नारायण शेळके हे पिकअप जीप (एमएच-१४,एचजी-९४३१) चालवीत पाली-खोपोली राज्यमार्गाने खोपोलीकडे जात होते. ते चिवे गावाच्या हद्दीत कमानीजवळ आले असता चिवे गावाकडून भरधाव वेगात आलेल्या दुचाकीने (एमएच-०६,सीई-३३१३) जीपच्या बंपरला ठोकर दिली. त्यानंतर पिकअप जीप साईडपट्टीवरील खड्ड्यात जाऊन पलटी झाली. या अपघातात दुचाकीवरील दोन तरुण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात पाठविण्यात आले.या अपघाताची नोंद पाली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस अंमलदार शिर्के हे करीत आहेत.

# पालीत दुकान फोडून मुद्देमाल लंपास

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील पाली बाजारपेठेमधील सतीश सिलिमकर यांचे सतीश फुटवेअर अँड मोबाईल या दुकानात सोमवारी (दि. २६) रात्री ते मंगळवारी सकाळी ८ यादरम्यान चोरी झाली. त्यामध्ये तब्बल ८८ हजारांचा मुद्देमाल चोरांनी लंपास केला आहे. दुकानाच्या शटरचे कुलूप फोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला व कार्यभाग साधला. याबाबत पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

# पेण वाशी येथे महिलांसाठी आरोग्य शिबिर

**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली व पेण तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांच्या पुढाकारातून माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानांतर्गत सोमवारी (दि. २६) पेण तालुक्यातील वाशी येथे विविध वयोगटातील महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात किशोरवयीन मुली, गरोदर माता तसेच स्तनदा माता यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

पेण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडकर, वैद्यकीय अधिकारी मनिषा म्हात्रे यांच्यासह डॉक्टर्स फॉर यू या संस्थेचे डॉक्टर्स, कर्मचारी, आशा सेविका आणि लाभार्थी या शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. प्रकाश गोपाळ पाटील** रा. मु. चेरवली, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - चेरवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ९ | ० | ०-०५-२०<br>वरकस ५-७८-००<br>पो.ख. १-०५-८०<br>एकूण- ७-१५-००<br>पैकी- ०-४०-०० | १४.०३<br><br>०.९६ |

**श्री. प्रकाश गोपाळ पाटील यांचे मालकीचे ०-४०-०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्राबाबत**

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक : २७/०९/२०२२

सही/-
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**

**पत्ता** - शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्पलेक्स, पहीला मजला, भाजी मार्केट जवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो नं ८१०८५५८२८९


# 'निर्यात कार्यशाळेमुळे पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव यातील अंतर कमी होईल'





**अलिबाग : जिमाका**

जिल्ह्यातील सर्व सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग क्षेत्रातील निर्यातक्षम उद्योजकांना मार्गदर्शन व्हावे, याकरिता आयोजित केलेल्या एकदिवसीय निर्यात कार्यशाळेच्या माध्यमातून पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव यातील अंतर कमी होऊ शकेल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सोमवारी (दि. २७) अलिबाग येथे व्यक्त केला.

उद्योग विभाग, उद्योग संचालनालय आणि लघुउद्योग विकास बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी अलिबागमधील जिल्हा नियोजन भवन येथे गुंतवणूक, आयात-निर्यात, व्यवसाय सुलभीकरण आणि एक जिल्हा एक उत्पादन या विषयावर निर्यात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा उद्योग केंद्र, लघुउद्योग विकास बँक, कृषी विभाग, औद्योगिक महामंडळ अशा सर्वांनी एकमेकांमध्ये समन्वय साधून व्यवसाय करणाऱ्यांना जास्तीत जास्त प्रोत्साहन द्यावे, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी या वेळी केली.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर पुढे म्हणाले की, सध्या रायगड जिल्ह्यात २०८ लहान मोठे औद्योगिक प्रकल्प असून यामध्ये



सुमारे ४५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे तर सुमारे २० ते २२ हजार लोकांना यातून रोजगार प्राप्त झाला आहे.

केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या डायरेक्टर जनरल ऑफ कमर्शिअल इंटलिजन्स या विभागाद्वारे २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे निर्यात राज्य असून एकूण निर्यात पाच लाख ४५ हजार कोटी रुपये असून रायगड जिल्ह्यात एकूण निर्यात सुमारे ४२ हजार कोटी रुपये इतकी आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांनी प्रास्ताविक केले. किरण करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रीय प्रबंधक शंपा बिश्वास, विदेश व्यापार महासंचालनालयाचे सुदर्शन येलाराम, जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, पणन महामंडळाचे उपमहाव्यवस्थापक भास्कर पाटील, पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे, आर्कोस इंडस्ट्रियल इस्टेटचे मारुती पवार, मैत्री संस्थेचे नोडल ऑफिसर कुंभलवार, लघु उद्योग विकास बँकेच्या नीतू थारकन, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, इंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे स्वप्निल बोभाटे, मरीन प्रॉडक्ट एक्सपोर्ट डेव्हलपमेंट अथॉरिटीच्या मंगल पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक शामकांत चकोर, आंबा निर्यात उद्योजक संदेश पाटील यांचयसह जिल्ह्यातील निर्यातक्षम उद्योजक व नवउद्योजक आदी या निर्यात कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते. या वेळी आयात-निर्यात व्यवसाय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी आपले अनुभव सांगितले. जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक शाम चकोर यांनी आभार मानले.

या निर्यात कार्यशाळेच्या निमित्ताने लघु उद्योग समूहातील तसेच प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतील लाभार्थ्यांनी त्यांच्या व्यवसायाबाबतचे स्टॉल प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रीय प्रबंधक शंपा बिश्वास, विदेश व्यापार महासंचालनालयाचे महासंचालक सुदर्शन येलाराम, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या, जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले आदी उपस्थित होते.

# महागाव फाट्यावर एसटी बसचा अपघात; सात प्रवासी जखमी

**पाली : प्रतिनिधी**



सुधागड तालुक्यातील महागाव फाट्यावर मंगळवारी (दि. २७) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास खेमवाडी-पेण या एसटी बस (एमएच-०७,सी-७४८८) चा ब्रेक निकामी होऊन अपघात झाला. बसमध्ये १३ प्रवासी होते. त्यामधील सात प्रवासी जखमी झाले असून बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जखमींवर पाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे बोर्ले, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची ताबेकब्जातील मिळकत/जमीन ही आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - बोर्ले, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| बोर्ले | पांडुरंग कानु पाटील | २४/२/अ | ०-६८-८०<br>पोट खराबा -०-०५-१०<br>एकूण क्षेत्र ०-७३-९० | ७.२२ |

सदरह जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधिताना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासन **०७ दिवसांच्या आत** आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह **खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.** जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०९/२०२२

सही/-
**ॲड. प्रल्हाद जी. खोपकर**

गाळा नं.१३०, पहिला माळा, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबा. नं. ९८१९१४४९९१



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे बेलवली, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची ताबेकब्जातील मिळकत/जमीन ही आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - बेलवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| बेलवली | हरीभाऊ दामु पाटील व वगैरे | १४० | ०-१६-४०<br>पोट खराबा -०-०१-३०<br>एकूण क्षेत्र ०-१७-७० | ६.४७ |

सदरह जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधिताना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासन **०७ दिवसांच्या आत** आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह **खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.** जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०९/२०२२

सही/-
**ॲड. प्रल्हाद जी. खोपकर**

गाळा नं.१३०, पहिला माळा, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबा. नं. ९८१९१४४९९१

## भारताचा आता द. आफ्रिकेशी सामना

# आज पहिली टी-२०लढत

**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियानंतर दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट संघ भारत दौर्‍यावर आला असून उभय देशांमध्ये प्रत्येकी तीन टी-२० आणि एकदिवसीय सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेतील पहिली टी-२० लढत बुधवारी (दि. २८) होणार आहे.

भारताला टी-२० विश्वचषकापूर्वी घरच्या मैदानावर दोन टी-२० मालिका खेळायच्या होत्या. त्यातील ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताने २-१ असा विजय मिळवला असून गेल्या काही महिन्यांत एकदाही न हरलेल्या आफ्रिकेशी भारत आता भिडणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) २३ ऑक्टोबरपासून सुरू होणार्‍या विश्चचषक स्पर्धेला समोर ठेवून हा दौरा आखला आहे.



यातील पहिला टी-२० सामना २८ सप्टेंबर रोजी तिरुवनंतपुरम येथे, दुसरा २ ऑक्टोबरला गुवाहाटीत आणि तिसरा ४ ऑक्टोबरला इंदौर येथे खेळला जाणार आहे. तिन्ही सामने संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होतील, तर पहिला एकदिवसीय सामना ६ ऑक्टोबर रोजी लखनऊ येथे, दुसरा ९ ऑक्टोबरला रांचीत आणि तिसरा ११ ऑक्टोबरला दिल्लीत होणार आहे. हे तिन्ही सामने दुपारी १.३० वाजता होतील. सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स व हॉटस्टारवरून होईल.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. भारताचे दोन स्टार खेळाडू संघाबाहेर झाले आहेत. भारतीय संघाचा स्टार खेळाडू दीपक हुड्डा दुखापतीमुळे, तर गोलंदाज मोहम्मद शमी कोरोनाची लागण झाल्यामुळे मालिकेतून बाहेर पडला आहे, तर हार्दिक पांड्याला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे.

हार्दिक पांड्याच्या जागी अष्टपैलू खेळाडू शाहबाज अहमदला संघात घेण्यात आले आहे. दीपक हुड्डाच्या जागी श्रेयस अय्यर, तर मोहम्मद शमीच्या बदल्यात उमेश यादवला संधी मिळाली आहे.

**भारतीय संघ**

रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), विराट कोहली, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, दिनेश कार्तिक, आर अश्विन, युझवेंद्र चहल, अक्षर पटेल, शाहबाज अहमद अर्शदीप सिंग, उमेश यादव, हर्षल पटेल, दीपक चहर, जसप्रीत बुमराह.

**दक्षिण आफ्रिका संघ**

टेंबा बावुमा (कर्णधार), क्विंटन डी कॉक, रीझा हेंड्रिक्स, हेनरिक क्लासेन, केशव महाराज, एडन मार्करम, डेव्हिड मिलर, लुंगी एनगिडी, एनरिक नॉर्खिया, वेन पारनेल, ड्वेन प्रिटोरियस, कगिसो रबाडा, ट्रिस्टन स्टब्स, रॅसी व्हॅन डर डुसेन, मार्को यानसेन, तबरेज शम्सी.

# राज्यस्तरीय बुडोकॉन कराटे स्पर्धेचे कर्जतच्या नरेश बडेकरला अजिंक्यपद

## इतर खेळाडूंनीही केली पदकांची लयलटू

**कर्जत : बातमीदार**

ठाणे येथे झालेल्या राज्यस्तरीय बुडोकॉन कराटे स्पर्धेत कर्जत येथील कराटेपटू नरेश बडेकर याने अजिंक्यपद पटकाविले आहे. स्पर्धेत कर्जत शहरातून स्पर्धेत सहभागी झालेल्या अनेक कराटेपटूंनी पदकांची लयलूट केली असून चार खेळाडूंना सुवर्णपदक मिळाले आहे.



ठाणे येथील युनायटेड बुडोकॉन कराटे अकॅडमीने नववी युबीकेअकप खुली राज्यस्तरीय कराटे स्पर्धा आयोजित केली होती. शेयनाई हॉल सभागृहात झालेल्या या स्पर्धेत राज्यभरातून ४०० कराटेपटूंनी सहभाग घेतला. कर्जत येथे आघाडीचा कराटेपटू नरेश बडेकर याने स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले. त्याचवेळी स्पर्धेत सहभागी झालेले कर्जत शहरातील कराटेपटू पायल भोसले हिने दोन सुवर्ण, हर्ष बडेकरने एक सुवर्ण व एक रौप्य, भूषण बडेकर, नरेश बडेकर व सोहम कांबळे यांनी प्रत्येकी एक सुवर्ण, तन्वी बडेकरने दोन रौप्य, सुजात मोरेने एक रौप्य व कांस्य आणि विराज शिंदे व अनुज चौहान यांनी प्रत्येकी एक कांस्यपदक जिंकले.

पदकविजेते स्पर्धक कर्जतमधील रेम्बो बुडोकॉन कराटे अकॅडमीचे कराटेपटू असून त्यांना वसंत शेट्टी, नरेश बडेक, विशाल गायकवाड, भूषण बडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जाते.



दै. रामप्रहर कर्मचारीवृंद, पनवेल



आरोही आणि आरुषी बनकर, नवीन पनवेल

# २० ऑक्टोबरला 'एमसीए'ची निवडणूक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई क्रिकेट संघटनेची (एमसीए) लांबणीवर पडलेली निवडणूक २० ऑक्टोबर रोजी होणार आहे. निवडणूक अधिकारी जे. एस. सहारिया यांनी सोमवारी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला.

या कार्यक्रमानुसार एमसीएच्या निवडणुकीत १४ जागांचा निर्णय होईल. २० ऑक्टोबरला वानखेडे स्टेडियमवरील एमसीएच्या कार्यालयात मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया होणार आहे. विशेष म्हणजे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) निवडणूक झाल्यानंतर दोन दिवसांनी एमसीएची निवडणूक होणार आहे. बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी एमसीएने माजी अध्यक्ष आशीष शेलार यांची प्रतिनिधी म्हणून निवड केली आहे.

भारताचे माजी क्रिकेटपटू संदीप पाटील यांनी एमसीएच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवणार असल्याचे यापूर्वीच सांगितले आहे. विद्यमान अध्यक्ष विजय पाटील निवडणूक लढवणार की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. उपाध्यक्ष अमोल काळे आणि मुंबई ट्वेन्टी-२० लीगचे कार्याध्यक्ष मिलिंद नार्वेकरसुद्धा अध्यक्षपदासाठी उत्सुक असल्याची चर्चा आहे. सचिव संजय नाईक पुन्हा या पदासाठी उत्सुक असून त्यांना कार्यकारी परिषदेचे सदस्य अजिंक्य नाईक आव्हान देऊ शकतील.



सुषमा पाटील विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठे.



श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर, पनवेल.



नवी मुंबई महापालिका शाळा क्र. २० तुर्भे गाव-नवी मुंबई



जेनी ट्युलीप सीबीएसई बोर्ड शाळेचा स्टाफ, नेरळ



खालापूर पंचायत समितीमधील अधिकारी व कर्मचारीवर्ग.



नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेचा बालवाडी विभाग.






डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेदिक कॉलेज, नेरूळ-नवी मुंबई.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com